११ मे १९६८ । चाळीस पैसे

# माणूस



खूप कुत्रे पाहिले. पण मनात आले, फुकट लेको तुमचे सगळे वैभव ! तुमच्या गळ्यात शोभिवंत असले तरी पट्टेच आहेत. खरा रुबाब पाहावा तो एखाद्या गावठी बिनपट्ट्याच्या कुत्र्याचा. सगळा मोहल्ला म्हणजे आपले साम्राज्य अशा ताठ मानेने उघड्यावर मनचाहे जगणाऱ्या त्या मुक्त श्वानाचा..........

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : पन्नासावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

स. न. एप्रील, ११

आपल्या 'माणूस' साप्ताहिकाचा मी नियमित वाचक आहे. गेल्या पांच अंकामधून 'मॉन्टीज डबल' वाचून फार आनंद झाला. अनुवादक श्री. अनंत भावे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते.

बाबु टांगेवाला यांच्याबद्दल श्रीयुत रेगे यांनी लिहिलेली मुलाखत वाचल्यावर 'माणूस' साप्ताहिक सर्वांचेच आहे असे नाही वाटत !

अत्यंत महत्त्वाचा असा वर्तमानकालचा अन्नप्रश्न सोडविण्यासाठी आपला 'अन्नस्वतंत्रता संचलन' हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याला सर्वांचा पाठिंबा आहे यात वाद नाही.

हसमुख शहा, पनवेल.

मल्य चाळीस पैसे

४१९ नारायण,

पुणे २

दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींचे स्वत्वाचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# संयुक्त आघाड्या आणि

मध्यप्रदेशातील संमिश्र मंत्रिमंडळ सध्या कोणत्या अवस्थेत उभे आहे, यासंबंधी काहीही ठामपणे सांगणे शक्य नाही. विशेषतः गोविंदनारायण सिंग यांच्या मंत्रिमंडळाला संयुक्त विधायक दलाचा पाठिंबा मिळणार नाही असे या दलाच्या प्रमुख श्रीमती विजयादेवी शिंदे यांनी सूचित केल्यापासून या मंत्रिमंडळाच्या भवितव्याविषयी अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत. विजयादेवींच्या संयुक्त विधायक दलाने आपला पाठिंबा जर खरोखरच काढून घेतला तर हे मंत्रिमंडळ आपोआपच कोसळणार आहे. परंतु विजयादेवी आपली धमकी कृतीत उतरविण्याच्या पराकोटीला जाणार नाहीत असा निरीक्षकांचा कयास आहे. कारण मध्यप्रदेशात काँग्रेसी राजवट प्रस्थापित होता कामा नये या जिद्दीपायीच त्यांनी संयुक्त विधायक दलाचे नेतृत्व स्वीकारले. सध्याचे संमिश्र मंत्रिमंडळ जर गडगडले तर आपली राजवट प्रस्थापित करण्याच्या संधीची वाट पाहात बसलेले श्यामनंदन मिश्र कोणतीही कारवाई करून काँग्रेसला सत्ताधिष्ठित करणार याविषयी संदेह वाटण्याचे कारण नाही. अशा परिस्थितीत विजयादेवी आपण होऊन श्यामनंदन मिश्रांची वाट मोकळी करणार नाहीत. त्यामुळे तूर्त तरी संमिश्र मंत्रिमंडळाला फारसा धोका नाही. अशी वस्तुस्थिती असली तरीदेखील या मंत्रिमंडळात अंतर्गत बेबनाव सुरू झाले असून अखेरीस त्याचे पर्यवसान कशात होणार आहे हे सांगणे तसे कठीणच आहे.

मध्यप्रदेशात हे असे घडायला मुख्य मंत्री गोविंदनारायण सिंग यांचा घरसोडीचा स्वभावच कारणीभूत आहे. सिंग हे मूळचे काँग्रेसपक्षीय सदस्य. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या डावपेचांमध्ये सिंगजी मागे पडले आणि या मानहानीचा सूड घेण्यासाठी त्यांनी काँग्रेसशी घटस्फोट घेऊन छत्तीसगड भागातील आपल्या सहकाऱ्यांच्या बळावर संयुक्त विधायक दलाशी वाटाघाटी सुरू केल्या आणि आपण जर मिश्र मंत्रिमंडळाविरुद्ध बंड पुकारले तर ते मंत्रिमंडळ निश्चितपणे पराभूत होईल याची निश्चिती झाल्यानंतर गोविंदनारायण सिंग यांनी पक्षान्तर करून संयुक्त आघाडीत प्रवेश केला. गोविंदनारायण सिंग यांचे वर्तन म्हणजे सत्ताकांक्षेपायी उघड उघड केलेला पक्षद्रोह होय. परंतु गेल्या वर्षीच्या राजकीय वातावरणात काँग्रेसेत्तर पक्षांना अशी काही धुंदी चढली होती की काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी कोणतीही किंमत देण्याची या पक्षांची तयारी होती. उत्तर प्रदेशात हेच घडले, हरियानामध्ये हेच घडले आणि याच प्रकारची मध्यप्रदेशातही पुनरावृत्ती घडली. परंतु अल्पावधीतच अंतर्गत कुरबुरी सुरू झाल्या आणि या मतभेदांच्या खडकावर संमिश्र मंत्रिमंडळाचे तारू फुटते की काय अशी परिस्थिती निर्माण होताच हे बंडखोर

# आगामी निवडणुका

काँग्रेसवाले पुन्हा काँग्रेसशी सख्य जोडू पाहू लागले. चरणसिंगांचा प्रयत्न फसला ही गोष्ट खरी असली तरी त्यांनी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्यामार्फत वाटाघाटी करून त्या दृष्टीने काही साध्य होत आहे की काय याची चाचपणी केली होती. गोविंदनारायण सिंग यांच्या हालचालीही त्या दिशेने चालू आहेत. मधूनच ते भोपाळमधून बाहेर पडतात. या वेळी ते कोणाशी कोठे चर्चा करतात याची मंत्रिमंडळातील इतर सहकाऱ्यांना माहिती नसते.

यातच कच्छ–शरणागती विरोधी सत्याग्रह सुरू झाल्यानंतर या सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी जनसंघाच्या सदस्यांनी आपापल्या मंत्रिपदांची त्यागपत्रे धाडून दिली. संयुक्त समाजवादी पक्षाचे मंत्रीही जनसंघीय मंत्र्यांचे अनुकरण करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. अशा रीतीने जनसंघ आणि संयुक्त समाजवादी या दोन पक्षांचे सहकार्य जर यापुढे मिळणार नसेल तर मग संमिश्र मंत्रिमंडळाची हालत काय होईल हे सांगणे फारसे अवघड नाही. या सर्व घटनांचा मागोवा घेतल्यानंतर कोणाचाही पाठिंबा मिळाला तरी चालेल पण मुख्य मंत्रिपद आपल्या हाती राहिले पाहिजे अशी आकांक्षा बाळगणाऱ्या गोविंदनारायण सिंग यांनी प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांशी त्रयस्थामार्फत बोलणी सुरू केली असली तर त्यात त्यांच्या दृष्टीने काहीही वावगे नाही.

अशा गैरप्रकाराबाबत कोणी कोणाला दूषणे द्यावीत अशीही परिस्थिती राहिलेली नाही. उत्तर प्रदेशात संयुक्त विधायक दलाचे मंत्रिमंडळ अधिकारावर येत असताना आपण हरिजन असल्यामुळे आपल्याला मुख्य मंत्रिपद मिळावयास हवे असा दावा करणाऱ्या विंदेश्वरीप्रसाद मंडल यांनी मुख्य मंत्रिपदाचा ‘चान्स’ हुकताच शोषित दलाच्या उभारणीच कार्य हाती घेतले आणि या दलातील काही आधार निश्चित होताच महेशप्रसाद सिन्हा यांच्याशी बोलणी करून संयुक्त मंत्रिमंडळाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. गोविंदनारायण सिंग यांनी मुख्य मंत्रिपद टिकविण्याच्या नादापायी बी. पी. मंडल यांचा कित्ता गिरविला तर ते आजच्या राजकीय आचारसंहितेला शोभूनच दिसेल.

ही झाली मध्यप्रदेशातील संयुक्त मंत्रिमंडळाची कहाणी. परंतु एकंदरीत संयुक्त दलांची चलती सर्वत्रच कमी होऊ लागली आहे हे केरळमधील नगरपालिकांचे नुकतेच जे निकाल प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून दिसून येते. काँग्रेस अधिक बंडखोर केरळ काँग्रेस विरुद्ध संयुक्त आघाडी असा हा सामना होता. या सामन्यामध्ये मतदारांनी संयुक्त आघाडीच्या विरुद्ध कौल दिलेला आहे. अवघ्या चारच नगरपालिकां-

सदाशिव पेठकर

मध्ये संयुक्त आघाडीला आपले बहुमत टिकविण्यात यश लाभले आहे. केरळमधील संयुक्त आघाडीच्या पराभवाबद्दल कोणालाच खेद वाटायचे कारण नाही. कारण तेथे या आघाडीवर डाव्या कम्युनिस्टांची हुकमत आहे. किंबहुना आपल्या कारवाया आपल्याला उजळ माथ्याने करता याव्यात यासाठी कम्युनिस्ट या संयुक्त आघाडीचा वापर करीत असतात. केरळमधील काही राजकीय कार्यकर्ते या आघाडीच्या किती आधीन गेले आहेत हे पाहायचे असेल तर तेथल्या संयुक्त समाजवाद्यांचे वर्तन तपासणे उद्बोधक ठरेल. केरळमधील मंत्रिमंडळात सहभागी झालेल्या दोघा संयुक्त समाजवादी मंत्र्यांनी आघाडीशी एकनिष्ठ राहण्यासाठी आपला पक्षच सोडून टाकला आहे. अशा रीतीने मंत्रिपद उपभोगणाऱ्या व्यक्तींच्या सार्वजनिक जीवनात कोणत्याच निष्ठा राहिलेल्या नाहीत असे आढळून येत असताना या संयुक्त आघाड्यांबाबत व विशेषत: जेथे कम्युनिस्टांचा वरचष्मा आहे अशा आघाड्यांबाबत कोणालाही अनुकंपा वाटण्याचे कारण नाही. केरळमधील नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये संयुक्त आघाडीचा पराभव झाल्याने या राज्यावर आपले एकतंत्री नियंत्रण आहे असा दावा करणाऱ्या डाव्या कम्युनिस्टांना चांगलीच चपराक बसली आहे सत्तेवर येताना डाव्या कम्युनिस्टांनी लोकांना भरमसाट आश्वासने दिलेली होती परंतु इतर पक्षांची राजवट आणि कम्युनिस्ट राजवट यांत काहीही फरक नसतो याचा वर्षभराच्या अनुभवानंतर लोकांना पडताळा आला आहे हेच या निकालावरून स्पष्ट होत आहे. केरळसारखा दक्षिण सीमेवरचा प्रदेश परराष्ट्रांतून येणाऱ्या आदेशानुसार कारवाया करणाऱ्या कम्युनिस्टांच्या तावडीतून बाहेर पडू लागला असेल तर ते एक सुचिन्हच समजले पाहिजे.

पश्चिम बंगाल, हरियाना आणि उत्तरप्रदेश या तीन राज्यांमध्ये लवकरच विधानसभांच्या निवडणुका होणार असून त्या वेळी संयुक्त आघाड्यांच्या राजकारणाबाबत लोकांची प्रतिक्रिया काय होणार आहे याचा आणखी एक कौल मिळेल. अर्थात या निवडणुकांमध्ये संयुक्त आघाड्यांना पराभव खावा लागणार आहे असे मानण्याचे मुळीच कारण नाही. कारण गेल्या वर्षभरात संमिश्र मंत्रिमंडळांनी कितीही गोंधळ घातला असला तरी काँग्रेस नको या एका आग्रहापायी सर्वसामान्य नागरिक आपले मत काँग्रेसविरोधी पक्षांच्या पेटीतच टाकणार हे उघड आहे. या परिस्थितीचा जर विरोधी पक्षांना योग्य फायदा घ्यायचा असेल आणि गेल्या वर्षीच्या गोंधळाची पुनरावृत्ती करण्याची इच्छा नसेल तर काही किमान प्रश्नांबाबत ज्यांचे एकमत आहे अशाच पक्षांची संयुक्त आघाडी बनविण्याची दक्षता घ्यावी लागेल. कच्छनिवाड्याच्या प्रश्नाबाबत कोणते पक्ष एकत्र येऊ शकले याचा जर विचार केला तर कोणत्या पक्षाची संयुक्त आघाडी कार्यक्षम ठरेल याचा बोध होण्यास हरकत नाही. मात्र त्यासाठी संकुचित पक्षीय स्वार्थ बाजूला फेकून देण्याचे धाष्टर्य दाखविण्याची नितान्त गरज आहे.


**—सदाशिव पेठकर**



# याला जीवन ऐसे नाव

जीवन जगायला काय लागत नाही ? सर्व काही लागते. पण जीवनात पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पाण्याचे दुसरे नाव जीवन. पाण्याबरोबरच इतर द्रव पदार्थांचे जीवनात कमी महत्त्व नाही.

पाण्याने सर्व चराचर सृष्टी व्यापली आहे. पाणी कोठे लागत नाही ? घरगुती उपयोगासाठी व पिण्यासाठी हरघडी पाणी लागते; शेती व उद्योगधंद्यांत तर अव्याहत पाण्याचा पुरवठा लागतो. तेव्हा त्यासाठी पाण्याची वाहतूक करावी लागते. काही विशिष्ट उद्योगधंद्यांत पाण्याप्रमाणेच रासायनिक द्रव्यांचीही वाहतूक करावी लागते. तसेच आरोग्य रक्षणासाठी पावसाचे पाणी अथवा सांडपाणी याचाही सतत निचरा करावा लागतो. पण ही कामे बिनबोभाट पार पाडण्याचे काम पंपाकडून केले जाते.



किर्लोस्कर पंपाकडून ही कामे अधिक जलद व विनासायास पार पाडता येतात.

सविस्तर माहितीसाठीं लिहा :

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड,** किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली.

# विचार वारे

। समीर ।

## ☐ भारतात ' संगीत संचालकां' ची आवश्यकता

भारतीय संगीताच्या प्रेमात पडलेले अमेरिकन संगीत-संचालक (इम्प्रेसेरियो) जे. हॉफ्मन उदयोन्मुख कलाकारांच्या शोधात नुकतेच भारतात येऊन गेले, तेव्हा भारतीय कलेची श्रेष्ठता जगाला पटविण्यासाठी काय काय करता येईल त्याची त्यांनी विस्तृत चर्चा केली. पहिली गोष्ट म्हणजे फ्रान्स, इटली आणि जपान यांच्या प्रमाणे भारतानेही कलाकारांची ' निर्यात ' केली पाहिजे. भारत सरकारने कलाकारांना प्रवास-खर्च-फक्त द्यावा व त्यांच्या वाटेत पीफॉर्म किंवा आपल्या इतर अडचणी उभ्या करू नयेत, सरकारने हे लक्षात घेतले पाहिजे की या देशात एवढी रत्ने आहेत, पण जगाला ती दिसल्याखेरीज जगाला त्यांची माहिती होणार नाही व त्यांचे मूल्यही कळणार नाही. सरकारने काही लाख रुपये बाजूला काढून ठेवावेत आणि अशी जाहीर घोषणा झाली की ' आमच्याजवळ एक महान कलात्मक वारसा आहे आणि आम्हाला तो जगाला दाखवायचा आहे. असे झाले तर अवघ्या तीन वर्षांत हिंदुस्थानाला मिळणाऱ्या परदेशी चलनाच्या उत्पन्नात केवळ कलाकारांमुळे दसपट वाढ होईल. पहिल्याप्रथम कलाकार परदेशी जाईल तेव्हा थोडेसेच परकीय चलन मिळवून आणील. दुसऱ्या वेळेला जास्त चलन मिळेल. आणि तिसऱ्या वेळेला रिझर्व्ह बँक संध्याकाळी खूप उशिरापर्यंत उघडी ठेवता येईल. ' भारत सरकारपुढे परकीय चलनाची गंभीर समस्या असताना कलाकारांना परदेशी पाठविणे शक्य आहे काय ? उत्तर ' का नाही ? प्रवास-खर्चात परकीय चलनाचा प्रश्न येत नाही. फक्त तिकिटाचे पैसे द्यायचे असतात व तिकीट रुपये खर्चून विकत घेता येते. ' अर्थात ज्या कलाकाराला परदेशांहून नीट आमंत्रण मिळालेले आहे अशांनाच प्रवास-खर्च द्यावा. शिवाय लगेच पुढच्या वर्षी पुन्हा त्याच देशाला जाण्यासाठी त्याला प्रवास-खर्च देण्यात येऊ नये. मात्र तो स्वतःच्या खर्चाने जाणार असेल तर त्याला देशासाठी परदेशी चलन कमावण्याची संधी अवश्य द्यावी.

हिंदुस्थानात 'इम्प्रेसेरियो' पद्धतीची फार आवश्यकता आहे. हिंदुस्थानात ही पद्धत शक्य तितक्या लवकर सुरू झाली नाही तर कलादृष्टया हिंदुस्थानाचे नुकसान होईल. हिंदुस्थानातली शिक्षण-पद्धती गुरु-शिष्य संबंधावर आधारलेली आहे. आता ती गुरु-शिष्य-समाज संबंधावर आधारली पाहिजे. आणि संगीतात समाजापर्यंत कोण पोचतो ? इम्प्रेसेरियो, म्हणजे संगीत कार्यक्रमांचा संचालक किंवा व्यवस्थापक. त्याला जर अभिरुची असेल तर आपण पाठिंबा दिलेला कलाकार श्रवणीयच असणार असा विश्वास तो रसिक जनतेत निर्माण करू शकतो. 'इम्प्रेसेरियो' पद्धत खासगीरीत्या पण सरकारी साहाय्याने सुरू करण्यात यावी. सरकारने व खासगी व्यक्तींनी त्यात पन्नास-पन्नास टक्के भांडवल गुंतवावे. या संगीत-संचालकांनी प्रसिद्ध व उदयोन्मुख अशा दोन्ही कलाकारांच्या कार्यक्रमांची मालिका ठेवावी, व प्रत्येक मालिकेतील शेवटच्या कार्यक्रमात ' नवध्वनीची मैफल ' ठेवावी म्हणजे उत्तरेत दक्षिणेचे संगीत, दक्षिणेत उत्तरेचे संगीत.

हिंदुस्थानात ही पद्धत का नाही ? उत्तर: ' कदाचित याचे कारण असे असावे की भारतीय वर्तमानपत्रांत कलात्मक घडामोडींच्या बातम्या येत असल्या तरी त्या आकर्षक पद्धतीने दिलेल्या नसतात. इतर बहुतेक सर्व देशांत या बातम्या आकर्षकपणे दिलेल्या असतात व त्यामुळे लोकांना आपल्या मोकळ्या वेळात काय करायचे. हे समजते, ' इम्प्रेसेरियो ' पद्धतीचा पाया महाविद्यालयात व विश्वविद्यालयात घातला गेला पाहिजे. त्यांनी या विषयातील परदेशी तज्ज्ञांना इकडे पाचारण करावे.

इम्प्रेसेरियो म्हणजे एजंट नव्हे. एजंट कमिशन घेतो. उलट इम्प्रेसेरियो प्रसंगी स्वतःचे पैसे खर्च करतो; कारण तो ज्या कलाकाराला पाठिंबा देतो त्याच्या कलात्मक योग्यतेवर त्याचा विश्वास असतो.

## ☐ परदेशी वृतपत्रांत भारताचे विकृत दर्शन

नुकत्याच दिल्लीला झालेल्या ' अंक्टाड ' परिषदेत भाषांतरकार म्हणून काम करण्यासाठी आलेले ब्रिटिश रहस्यकथा लेखक पिकरिंग यांची दोन मते.

यूनोमध्ये भाषांतरकार म्हणून काम करणे ही लेखकासाठी आदर्श नोकरी आहे. कारण सहा महिने नोकरी केल्यावर इतके पैसे मिळतात की वर्षातले बाकीचे सहा महिने एकान्तवासात राहून वाचन व लेखन करता येते. शिवाय या नोकरीत प्रवासाची व अनेक लोकांना भेटण्याची संधी मिळते.

हिंदुस्थानची भेट डोळे उघडणारी होती. पाश्चिमात्य वर्तमानपत्रांच्या नव्या दिल्लीतील वार्ताहरांनी पाठविलेल्या बातम्या वाचून माझी जी कल्पना झाली होती त्यापेक्षा येथील अन्न-परिस्थिती खूपच चांगली आहे, ' ते हिंदुस्थानाबद्दल आगदीच विकृत बातम्या पाठवितात. '



या वितभर कार्ट्याची किंमत पंधराशे रुपये? भू:

माणसांचे सोहळे पाहून कंटाळलो होतो. असलाच एक सोहळा पाहून येताना एका भिंतीवर फ्रीस्टाइल कुस्त्यांच्या अक्राळविक्राळ भित्तीपत्रकांबरोबर काही साधी-बेगडी पत्रके दिसली. ती डॉग शो म्हणजे कुत्र्यांच्या सोहळ्याची होती. अखिल भारतीय श्वानपालन संघातर्फे हा सतरावा वार्षिक सोहळा मुंबईतल्या ब्रेबर्न स्टेडियमवर होऊ घातला होता. मनाशीच एक उडी मारून मी म्हणालो, रुचिपालट म्हणून हा सोहळा छान आहे! आणि काही दिवसांमागे एका संध्याकाळी या सोहळ्यासाठी ब्रेबर्न स्टेडियमवर झुकलो.

ब्रेबर्न स्टेडियम चेंडूमागे धावणाऱ्या माणसांच्या प्रदर्शनासाठी पूर्वापार ख्यातनाम आहे; तिथे चेंडूमागे धावणारे कुत्रे आणि त्यांना टाळ्या देणारी माणसे पाहून एकदम झक्क वाटले. प्रवेशद्वाराशी चौकशी करता कळले की, डॉग शो पैकी कुत्र्याच्या आज्ञानधारकतेची स्पर्धा सांप्रत चालू होती. हे सांगणाऱ्या तरुण पोशाखाच्या वयस्क पारशी बायांवर चालू सोहळ्याचा असर होता की काय कोण जाणे, पण हलक्या आवाजात 'गुर्र भुक्' करावे तसे काहीसे त्यांनी हे सांगितले. लगोलग जवळची एक 'स्मरणिका' पुढे करीत त्यातली एक अगदी विरुद्ध अशा 'ऊं...कूं...कूं...कूं...' इत्यादी स्वरात म्हणाली; प्लीऽज हॅव धिस, सर. टू रुपीज ओन्ली! स्वरातल्या

विजय । तेंडुलकर

रातराणी । रातराणी

# डॉग । । शो

फरकाने दोन रुपये आपोआप खिशातून बाहेर आले. स्मरणिका नावाचा प्रथमदर्शनी तरी फक्त स्पर्धक कुत्र्यांनाच उपयुक्त वाटणारा कागदांचा भारा काखोटीला मारून आमची स्वारी नॉर्थ स्टँडमध्ये घुसली.

भव्य मैदानाच्या एका कोपऱ्यात खुर्च्यांच्या विस्कळित हरींमधोमध पांढऱ्या चुनखडीच्या आडव्या उभ्या रेघा आखून एक-दोन-तीन असे क्रमांक असलेल्या उभ्या पाटया विखरून ठेवलेल्या दिसल्या. दूरध्वनीक्षेपकावरून एक सूटवाले उंच चष्मिस्ट गोरे गोरे पारशी गृहस्थ मनमिळाऊ इंग्रजीत चालू स्पर्धेच्या सूचना देत होते. मधोमधच्या पांढऱ्या पाटयांत काही कुत्री आणि त्यांना साखळीने जखडलेले त्यांचे मालक आणि मालकिणी उभ्या होत्या. म्हणजे गाडयाबरोबर नळयाची यात्रा म्हणतात.

तशी 'अरे अरे टॉमी – जॅकी–बंटी-फंटूश नाही तर मिकी' करीत ही मालक मंडळी आपापल्या कुत्र्यांमागून इथे येऊन उभी होती, पण वस्तुत: त्यांना इथे कसलेच स्वतंत्र स्थान दिसत नव्हते. खुद्द कुत्र्यांना वस्त्राअभावी स्पर्धक-क्रमांकाची लेबले टाचणे अशक्य असल्याने ती टाचून घेण्यासाठी सोईस्कर स-वस्त्र खांब म्हणूनच जणू माणसांना इथे उभे केले होते! कुत्र्यांचा रुबाव एकसे एक ज्यादा

तर तुलनेने ही लेबलांसाठी माणसे अगदीच बिचारी वाटत होती. कुणाच्या मुद्रेवर कुत्र्याच्या अंकिताची असहायता होती तर कुणाच्या मुद्रेवर 'माझा बाब्या तो, कछा छान दिसतो'चा वत्सल भाव निथळत होता.

कुणी वर वर सहास्य आविर्भावाखाली आपल्या कुत्र्यावर सारखे दीर्घकालीन नाराजीने गुरगुरत होते तर एखादे कुत्रेच मालकावर एकसारखे संतापून टापरताना दिसत होते! ही माणसांसारखी कुत्री आणि कुत्र्यांसारखी माणसे यांच्या अधून मधून दोन तीन पोक्त गृहस्थ आपली कुत्री हरवल्यासारखे अत्यंत गंभीरपणे वावरत होते. मधूनच ते समोरचे एखादे कुत्रे भेदक नजरेने एकटक न्याहाळत; 'हाच तर आमचा नसेल?...' अशा चेहऱ्याने. मग कसला तरी मूलभूत आणि गहन विचार करीत. उदा. हे कुत्रेच कशावरून? कोल्हा किंवा पोपट कशावरून नसेल?...मधूनच एखाद्या कुत्र्याला ते आज्ञा करीत. किंवा मालकाला आज्ञा करीत आणि मालक कुत्र्याला विनंती करी. आपल्यासाठी बक्षिसे आहेत याचा वास असल्याप्रमाणे हे बेटे बडचा घरचे चतुर श्वान तत्परतेने या आज्ञा आणि विनंत्यांचे कधी अचूक, कधी चुकीचे पण पालन करताना दिसत होते.

या अज्ञाधारकता-स्पर्धात हिंदी परीक्षांप्रमाणे प्रवेश, परिचय, प्रवीण, प्राज्ञ, पंडित, रत्न अशा पद्धतीच्या यत्ता असल्याचे चौकशी न करताच कळले. शेवटची यत्ता 'ग्रॅज्युएट' कुत्र्यांची होती. त्याखालोखालची अर्थात 'अंडरग्रॅज्युएट' कुत्र्यांची. कुत्र्यांकडे अत्यंत भेदकपणे बघणारे ते दोन तीन गृहस्थ स्पर्धेतले परीक्षक असावेत. माणसांच्या स्पर्धांतदेखील पक्षपाताचे आरोप करून भुंकणारे आणि चावणारे भेटतात, मग ही तर सरळ सरळ भुंकणारांची आणि चावणारांचीच स्पर्धा; त्यामुळेच की काय, परीक्षक शंभर आकडे मोजून आपले निर्णय घेत असले पाहिजत.

ही झाली मैदानात आखलेल्या पाटचांमधली परिस्थिती. प्रेक्षकातदेखील बहुसंख्य प्रेक्षक एकना एक कुत्र्याचे मालक दिसत होते. कुणाची दोन-दोन आणि क्वचित चार-चारही कुत्री होती. म्हणजे दुसऱ्यांची कुत्री पहाण्यापेक्षा आपला डॉगी दाखवण्यासाठीच हे सर्व उन्हातान्हातून 'ल्हा ल्हा' करीत इथे केव्हापासून येऊन पोचले होते. कुत्रे जवळ बांधून—क्वचित मांडीवर घेऊन किंवा खोक्यात ठेवून – ही मंडळी कंटाळलेल्या किंवा एकाग्र मुद्रांनी समोरच्या स्पर्धा एकीकडे पाहात, खात, पेंगत, लिपस्टिक लावीत किंवा आपल्या चतुष्पाद 'बाब्या'चे लाड करताना दिसत होती. कोणी स्पर्धेच्या कुत्र्याबरोबर त्याची प्रजा विक्रीसाठी आणून मांडली होती. एखादे घ्यावे म्हणून चौकशी केली तर कुत्र्याचे एक गोजिरवाणे वीतभर कार्टे चांगले साडेतीनशे रुपयांचे निघाले! या धक्क्यातून सावरतो तर आदल्या दिवशीच एक कुत्रे नगद पंधराशे रुपयांना विकले गेल्याचे एका उत्साही कुत्रा-मित्राने सुनावले! पंधराशे कुत्रे? भू:!

कुत्र्याचे मालक नसलेले काही विशुद्ध प्रेक्षकही या सोहळचात हिंडत होते

त्यांच्यापाशी कुत्रा नव्हता ही त्यांची झाली एक खूण; पण मुख्य म्हणजे समस्त कुत्र्यांपासून किमान दोन हात अंतर कटाक्षाने राखून ही मंडळी प्रत्येकाचे 'च्यक् च्यक्' 'ट्रिचिक् ट्रिचिक्' इत्यादी कौतुक लांबूनच सुरक्षित अंतर ठेवून करीत होती. त्यांनी कुत्र्यांच्याबाबतीत घी त्याचप्रमाणे बडगाहो पाहिलेला असणार. प्रदर्शनातले कुत्रे सर्वसाधारणत: अहिंसक होते म्हणून काही सगळेच कुत्रे अहिंसक आणि आपले दात म्हणजे केवळ पशु-डॉक्टराला दाखवण्याची चीज समजणारे नसतात.

## वेगवेगळ्या जमाती

एवढी हरप्रकारची व्यक्तित्वसंपन्न कुत्री बाकी या आधी निदान मी तरी कुठंच एकत्र बघितली नव्हती. 'डॅशहुण्ड' जातीचा तपकिरी, गुबगुबीत, लांबोडका कुत्रा पाहून वाटले की शेपटीऐवजी चुकून कुणीतरी त्याचे पायच निम्मे निम्मे छाटले असावेत; आणि ते मागत तो बापडा ज्याच्या त्याच्या पुढे पुढे करतो आहे. याउलट 'मुधोळ हाउण्ड' याने कोणत्या तरी प्रश्नासाठी खरोखरीचे प्रदीर्घ प्राणांतिक उपोषण केले असावे तसा याचा देह उंचाटा, बरगड्या बाहेर दिसणारा, झिडपिडा. पण तोरा आपणच ते काळवीट असल्यासारखा ! हा या प्रदर्शनातला एकमेव अस्सल शाण्णव कुळीचा मराठी कुत्रा असे माहीतगाराने माझा अस्सल फाटका मऱ्हाठी नूर पाहून की काय मला सांगितले. त्या अगदीच अनाकर्षक कुत्र्याकडे मग मी प्रदर्शन संपेस्तोवर जास्तीत जास्त बंधुभावाने आणि अभिमानाने पुन: पुन्हा पाहून घेतले. ( तो पळ-प्याला तेज हा त्याच्याविषयीचा तपशील मात्र अस्वस्थ करणारा होता. ) 'फॉक्स टेरिअर' म्हणून एक टुमदार धिटुकली जात प्रदर्शनात होती. तिच्या पूर्वजांची कुणी-तरी जोरदार खोडी काढलेली असावी तसा या जातीचा प्रत्येक कुत्रा एक कान दुमडून, वटारलेल्या डोळ्यांनी आणि फुरफुरत्या लांब नाकाने अख्ख्या प्रदर्शनाकडे संशयाने आणि भांडखोरपणे टवकारून बघत होता. त्याच्या शेपटीत त्याची अस्मिता म्हणतात ती असावी कारण ती एकदम ताठ होती. या कमजास्त नाकेल्या श्वान-जमातींच्या तुलनेने 'बोस्टन टेरियर', 'बॉक्सर' वगैरे जमाती आपल्या नकट्या फेंगट्या नाकांनी लहानमोठ्या आकारात उठून दिसत होत्या. नाकाची उणीव ही मंडळी सुपीरिऑरिटी कॉम्प्लेक्स ऊर्फ अवसानाने भरून काढीत होती. या जाती दिसण्याला उग्र पण स्वभावाने भलत्याच उमद्या आणि सहृदय असतात असे निदान स्मरणिकेतील त्यांच्या परिचयात म्हटले होते. 'पूडल्स' म्हणूनही एक स्त्रैण जमात किरट्या बायकी आवाजात वाव् वाव् करून केकटत आपल्या भुरभुरीत लोकरी केसांच्या 'हेअर-स्टाइल्स' करून या प्रदर्शनात कुलाब्याच्या ख्रिश्चन पोरींप्रमाणे तुरतुरत होती. अशा किती जाती आणि किती तऱ्हा– माणसे मुळी नजरेतच भरत नव्हती. एरवी कुठेही नजर बांधून घेतील अशी बांधेसूद आणि चित्ताकर्षक 'माणसे' ही या प्रदर्शनात कुत्र्यांनी तात्पुरती तरी निष्प्रभ करून टाकली होती. काही काही माणसांवर त्यांच्या कुत्र्यांचा असर सहवासाने पडला असावा किंवा दोघे पूर्वजन्मी

सहोदर असावेत तसे साम्य दोहोंच्या चेहऱ्या-मोहऱ्यात जाणवत होते. 'ग्रेट डेन' नामक धिप्पाड कुत्र्याच्या मोठ्या जबड्याच्या सव्वासहा फुटी, मिशाळ मालकालाच पाहून वाटले की हाच तो ग्रेटडेन ! अर्थात तुलनेने त्याच्या कुत्र्याचा तोरा काकणभर ग्रेटर डेनचा होता म्हणानात.

## फॅन्सी ड्रेस

पण खरा मजा आला कुत्रे मंडळीच्या फॅन्सी ड्रेस-स्पर्धेत. या स्पर्धेत कुत्र्यांना चित्रविचित्र कपडे घातले होते. मुळात कपडे कमीतकमी घालण्यात माणसांची आजकाल स्पर्धा लागलेली असताना ही कुत्र्यांची कपडे घालण्याची स्पर्धा निश्चितच आगळी होती. एका हलक्या फुलक्या पांढऱ्या शुभ्र कुत्र्याला रंगीबेरंगी पंख बांधून त्याचे 'फुलपाखरू' बनवण्यात आले होते तर दुसऱ्या एका नवजात पिल्लाला मखमलीच्या पिशवीत मानेपर्यंत रिबिन–बंद करून 'ईस्टर एग' म्हणून सर्वांसमोर आणण्यात आले. ते बटे ठेवल्याजागी 'गाई' करीत होते. एका कुत्र्याचा 'विदूषक' बनवण्यात आला होता तर दुसऱ्या एकाचा 'विक्षिप्त' म्हणून साजशृंगार करण्यात आला होता. कुत्र्यांच्या एका जोडगोळीला नेमबाज विल्यम टेल आणि डोक्यावर सफरचंद घेतलेल्या त्याच्या मुलाचे सोंग देण्यात आले होते. एक छबकडे शहाणे कुत्रे राजस्थानी नर्तकीचा रंगीबेरंगी छबेला पोशाख घालून आले तर चिनी वेष घातलेल्या एका काळोपंतांनी रिंगणात ओढाताण करीत येताच प्रथम बसकी चिनी टोपी झुगारली. ती आणून डोक्यावर परत कशीबशी ठेवण्यात येते तो मागच्या पायातली लांब झुळझुळीत तुमान सोडून ते चक्क दत्तदिगंबर झाले ! कुत्री झाली तरी सगळीच कुत्री आपली संस्कृती सहजासहजी कशी सोडतील ? त्या संस्कृती-संरक्षक कुत्र्याच्या हौशी मालकिणीला चिडता थोडे झाले; पण काय करणार ! दिवस आणि प्रसंग कुत्र्यांचा होता ! 'यू नॉटी नॉटी बॉय' 'नो, नो, डार्लिंग' वगैरे दबल्या लाडिक चडफडत्या सुरात पुटपुटत बिचारीने त्या विवस्त्र चिन्याला एकदाचे रिंगणाबाहेर खेचत नेले आणि काही अंतरावर दोन सणसणीत धबके त्याच्या पाठीत लगावले ! आता ती मुद्दाम या स्पर्धेसाठी शिवून घेतलेली काळी रेशमी तुमान कोण नेसणार होते ? त्याचा मालक ?

स्पर्धा कुत्र्यांची असली तरी पारितोषिके—बॉलपेन्स, पेन्स, चांदीचे चषक वगैरे—माणसांना बहाल केली जात होती. त्याहूनही वाईट हे की यातले काहीच दूरान्वयानदेखील कुत्र्यांच्या उपयोगाचे नव्हते ! धावावे घोड्यांनी आणि गबर व्हावे माणसांनी त्यातलाच हा आणखी एक पिळवणुकीचा प्रकार वाटला, झाले.

पण तरीही त्या दिवसापुरते, तात्पुरते का होईना, कुत्र्यांनी माणसांना निष्प्रभ करून टाकले होते. एरवी माणसांमागून शेपटी हलवीत जाणाऱ्या या इमानी प्राण्याने त्या दिवशी तरी माणसांना आपल्या मागून फरफटत येण्याला भाग पाडले होते; हे तरी काय थोडे होते ?

खूप कुत्रे पाहिले. पण परतताना मनात आले, फुकट लेको तुमचे सगळे वैभव ! तुमच्या गळ्यात शोभिवंत असले तरी पट्टेच आहेत. खरा रुबाब पाहावा या प्रदर्शनात रिघाव नसलेल्या, रस्तोरस्ती दुडक्या चालीने हिंडणाऱ्या एखाद्या गावठी बिनपट्ट्याच्या कुत्र्याचा ! सगळा मोहल्ला म्हणजे आपलेच साम्राज्य आणि रस्त्यावरच्या सर्व कुत्र्या म्हणजे आपलाच जनानखाना असल्याप्रमाणे ताठ मानेने उघड्यावर मनचाहे जगणाऱ्या या कळकट मळकट पण मुक्त श्वानाची टेचदार कलंदर गंमत उंची घरच्या या सुरक्षित, तालेवार कुत्र्यांच्याकडे नाहीच ! ◻

## ओ डॅड पूअर डॅड

लांब, हृदयस्पर्शी, अनुप्रासयुक्त नावांची नाटके केवळ मराठीतच असतात हा आपला समज दूर करणारे एक इंग्रजी नाटक नुकतेच मुंबईत झाले. त्याचे नाव होते 'ओ डॅड, पूअर डॅड, ममा हॅज हंग यू इन द क्लोजेट अँड आय ॲम फीलिंग सो सॅड. मराठीत याचा अर्थ, बाबा, बिच्चारे बाबा ते, आईने तुम्हाला कपाटात टांगून ठेवलंय नि मला कसे अगदी उदास वाटते आहे.

आहे का नाही भले लांब नाव ? असे आहे मराठीत ? आणि बाबांना आईने कपाटात टांगून ठेवणे हे हृदयस्पर्शी नाही असे कोण म्हणेल ? पुन्हा यामुळे पोराला उदास वाटण्याचा हळवा, भावुक प्रकारही जोडीला आहे. डॅड आणि सॅडचा अनुप्रास जमला आहे. इतके असल्यावर या नावाचा अर्थ विचारण्याच्या फंदात शहाणा माणूस पडणार नाही.

असे हे मालगाडीसारख्या लांबलचक नावाचे नाटक 'थिएटर ग्रुप' या मुंबईतील इंग्रजी नाटके करणाऱ्या संस्थेने नुकतेच सादर केले. अॅलेक पदमसी हे या संस्थेचे आधारस्तंभ आहेत. हे गृहस्थ गेली बरीच वर्षे मुंबईत इंग्रजी नाटके करतात आणि ती चांगलीच होतात अशी प्रसिद्धी आहे. म्हणजे नाटकाबद्दल दुमत होईल पण प्रयोगाबद्दल सहसा होणार नाही. मध्यंतरी इंग्लंडमध्ये नेण्यात येणार होते पण पण आणीबाणीची सबब सांगून महाराष्ट्र सरकारने आयत्या वेळी रोखून धरले, ते 'अ टच् ऑफ ब्राइटनेस' नावाचे भारतीय इंग्रजी नाटक यांनीच दिग्दर्शित केलेले होते. पदमसी सादर करतात त्या नाटकांची आता एक जातच ठरल्यासारखी आहे. ही नाटके धक्का देणारी आणि थोडीबहुत तरी खळबळजनक असतात. अर्थात

इंग्रजी नाटकांच्या मुंबईकर उच्चवर्गीय प्रेक्षकांना ती फारशी खळबळवू शकत नाहीत कारण स्वभावतःच हा प्रेक्षक अर्धपाश्चात्य, थंड आणि एक सायंकालीन सामाजिक जबाबदारी म्हणून पदमसींसारख्यांची नाटके पाहणारा आहे.

## बऱ्यापैकी करमणूक

प्रस्तुतचे तेजपाल नाट्यगृहात पदमसींनीं सादर केलेले नाटक याच 'धक्का' पद्धतीचे होते. आर्थर कोपिटनामक नाटककाराचे हे नाटक मूळचे फ्रेंचमधले. पदमसी यांनी स्वतः ते इंग्रजीत उतरवले. आपला नटसंच आणि प्रेक्षक लक्षात घेऊन हा अनुवाद त्यांनी बराच सैलपणे केला असावा. कारण मूळ नाटकाशी जाणवणारे कुठलेही साम्य अनवधानाने राहिलेले समजावे, अशी एक मिष्किल सूचना इंग्रजी प्रयोगाच्या परिचयपत्रिकेत छापलेली होती.

ते काही का असेना, विक्षिप्त नावाच्या या विक्षिप्त नाटकाने विक्षिप्त शैलीचीच, पण एक बरी करमणूक दिली यात शंका नाही.

असल्या नाटकांचे कथानक सांगू नये. कारण रंगमंचावरच त्याची रंगत कळते. पण ते थोडेबहुत सांगायचेच तर मादाम रोजपेटल (श्रीमती गुलाब पाकळी) या नावाची एक ठेंगणीठुसकी, जहांबाज, विधवा पुरंध्री येऊन हॅवानातल्या एका हॉटेलमध्ये उतरते. ही आपादमस्तक काळ्या पोशाखात असते. लालसर, पिंगट, खोट्या केसांचा एक उंचच उंच टोप हिच्या डोक्यावर शोभत असतो. गळ्यात शिट्टीसारखी वाजवायची एक चांदीची मोठी किल्ली रुळत असते. हिच्या सामानसुमानात माश्या मारण्याची एक काठी, माश्या खाणारे एक झाड आणि माशाची एक मांसाहारी मादी आहे; तिचे नाव रोजलिंडा, तसेच एक घड्याळ आहे त्यातून ठराविक वेळाने एक भयानक कुरूप पक्षी बाहेर येऊन गळा दाबल्यासारखा अभद्र ओरडतो. याशिवाय तिच्याबरोबर जोनाथन नावाचा तिचा 'मोरू' मुलगा आहे, या मुलाचा पोस्टाच्या जुन्यापान्या स्टॅम्प्सचा, नाण्यांचा आणि पुस्तकांचा गठ्ठ्यावारी साठा आहे, पण याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तिच्याबरोबर तिचा पेंढा भरलेला सूटबुटातला अपटुडेट मृत नवरा आहे! हा ती जाईल तिथे गावोगाव अगत्यपूर्वक आपल्याबरोबर फिरवते आणि कपाटात व्यवस्थित टांगून ठेवते. हिला स्वतःचे घरबीर कसे नाही? ही निःश्वास टाकून म्हणते की फार तरुण नाही तर फार वृद्ध माणसांनाच काय ती स्वतःची घरे असतात. हिचा नवरा मेला कसा? हिनेच त्याला एक दिवशी गळा दाबून मारले. का मारले? हा मुळात तिच्या दृष्टीने तिला सर्वस्वी नालायक आणि निकामी पुरुष, त्यात दगाबाजीने त्याने तिला मुलगा दिला. त्यातच सेक्रेटरीशी त्याचे लफडे

---

**ओ डॅड, पूअर डॅड, ममा हॅज हंग यू इनद्**

---



हुकूमशहा बायको आणि पडखाऊ नवरा

जोरात चालू झाले आणि ही सेक्रेटरी चक्क कुरूप होती. म्हणून हिने त्याला मारले. तरी पण मरणान्तानि वैराणि या नियमाने आता त्याच्याशी तिचे मुळीही वैर नाही. म्हणून ती त्याला सदैव स्वतःबरोबर वागवते आणि अगत्यपूर्वक कपाटात टांगून ठेवते. नवरा निकामी तर हिच्या छायेत वाढलेला दुसरा पुरुष, हिचा मुलगा जोनाथन, अर्धवट आहे. घोड्याएवढा वाढूनही तो अत्यंत पोरकट, आचरट, तोतरा आणि स्त्रीच्याबाबतीत पार भीरू आहे. कसल्या ना कसल्या भयाने तो पछाडलेला आहे. याची आई सांगते त्या याच्या जन्मकथेप्रमाणे नवाऐवजी बारा महिने हा आईच्या पोटात दडलेला होता आणि नाइलाजाने जन्मला तेव्हा याला दात येऊ लागलेले होते! मादाम रोजपेटलचे या पंटया जोनाथनवर तिच्या खग्रास पद्धतीचे प्रेम आहे; म्हणजे तिन

---

**क्लोजेट ॲंड आय ॲम फीलिंग सो सॅड**

---

याला खुद्द आपल्या व्यतिरिक्त दुसरी स्त्रीच भेटू दिलेली नाही. जुनेपाने स्टॅंप्स, नाणी, रद्दी हेच त्याचे जग आहे. माश्या खाणारे झाड आणि माशाची मांसाहारी मादी हीच त्याची संगत आहे आणि या दोहोंविषयी त्याच्या मनात भययुक्त द्वेष आहे. आईविषयीही वरवरच्या आज्ञाधारकतेखाली हेच असावे.

## सगळेच काही गहन आणि भयंकर

पहिल्या प्रवेशात ही मादाम रोजपेटल त्या हॉटेलात येऊन उतरते आणि कशाच्या तरी तालावर नाचत कामे करणाऱ्या, हॉटेलच्या गणवेषवाल्या नोकर वर्गाला–तेही पुरुषच–आपल्या जहांबाज तऱ्हेवाईक वागण्याने पुरते तंग आणि नरम आणते. दुसऱ्या प्रवेशात उंची कुटुंबातली पोरे सांभाळणारी हॉटेलातली रोजालि नामक एक तरणी फटाकडी येऊन जोनाथनला चिकटते. जोनाथन अंग चोरतो तेवढी ही त्याला–माश्या खाणाऱ्या झाडासारखी–जास्त जास्तच झडपते. त्याला त्याच्या आईपासून लांब काढून माशाच्या मांसाहारी मादीप्रमाणे गिळंकृत करण्याची महत्त्वाकांक्षा धरते. तिसऱ्या प्रवेशात मादाम रोजपेटल कुणा एका वयोवृद्ध, अक्षरशः गलितगात्र अशा कमांडर रोजअबव्ह नामक निकामी विधुर पुरुषाला गाठून त्याला हॉटेली आणून, रोजाली जोनाथनचे करू पाहते तेच याचे करू पाहते. हे करताना अत्यंत भावपूर्ण स्वरात आपल्या दिवंगत नवऱ्याची निर्भर्त्सना करते. त्याचा ध्वनिमुद्रित आवाज आर्त मुद्रेने ऐकवते. त्याची अखेरची कहाणी सविस्तर ऐकवते. कमांडरचे आधीच लटपटते पाय या वृत्तान्ताने दुमडू पाहतात. तो भयग्रस्त पुरुष पुरता मादाम रोजपेटलच्या कब्जात जाऊ लागतो. यानंतर कमांडरने कपाटातील आपल्या दिवंगत पतीचे पवित्र दर्शन एकदा घेतले पाहिजे ही मादाम रोजपेटलची अत्युत्कट इच्छा अव्हेरून तो कसाबसा जीव घेऊन भेलकांडत तिच्या जाळ्यातून सुटून जातो. मादामचा दारुण अपेक्षाभंग होतो. शेवटच्या आणि अखेरच्या प्रवेशात रात्रीच्या चढत्या प्रहरी मादाम समुद्रकिनारी गेली आहे. काळोखात प्रणयी जोडपी हुडकून त्यांच्यावर पायांनी वाळू उधळणे हे ती आपले पवित्र कर्तव्य समजून धर्मकृत्याइतक्या गंभीरपणे करते. ती तिकडे या कृत्यात गुंतली असता माश्या खाणारे भुकेजले वखवखले झाड जोनाथनलाच, रोजालीने झडपावे तसे झडपते आणि याच्या मगरमिठीतून सुटण्यासाठी झालेल्या झटापटीत जोनाथनच्या हातून झाडाचा ‘ खून ’ घडतो. माशाच्या मांसाहारी मादीचाही जोनाथन निकाल लावतो. यातच फार अभद्र ओरडू लागलेल्या घड्याळातल्या कुरूप पक्षाचा भयग्रस्त जोनाथन गळा आवळतो. आणि अशा स्थितीत उन्मादक फटाकडी रोजाली निर्धाराने येऊन पोचते. मादाम रोजपेटलच्या शय्येकडे ती धामाधूम जोनाथनला नेऊ पाहते. दोघांची शैय्येवर हातघाईची झटापट चालली असता त्यातच कपाटातला पेंढा भरलेला जोनाथनचा टांगला बाप ओंडक्यासारखा येऊन उपडा शैय्येवरच पडतो. हा नसता अडथळा एकीकडे हातापायांनी बाजूला करीत वखवखली रोजाली जोनाथनचा

घात करू पाहात असताना त्या माझ्या खाणाऱ्या झाडाप्रमाणेच भीरू जोनाथनच्या हातून प्राणभयापोटी रोजालीचाही खून घडतो.

हे सर्व आता आईला कळणार या भयाने तर जोनाथन अर्धमेला होतो. त्याच्या केविलवाण्या धडपडीत, खूप उंचावरून जाणाऱ्या विमानाकडे तो ' हेल्प '–'मदत ' असे लिहून फुगादेखील सोडून आपल्या मुक्ततेची आशा करतो. शेवटी बाहेर मादाम रोजपेटल येऊन पोचते. ती आली आहे हे तिच्या हाकांनी जाणवताच घाईने जोनाथन पेंढा भरल्याप्रमाणे स्वतःला खुंटीला टांगून घेतो. मादाम रोजपेटल येते आणि सर्व पाहते. पेंढा भरल्याप्रमाणे लोंबणाऱ्या निष्प्राण जोनाथनकडे ती अखेर निश्चळपणे, ताठपणे पाहात असता पडदा पडतो.

## विनोदाची झालर

तुम्ही म्हणाल, यात काय आहे हो करमणूक ? हे तर सारे भयंकर आणि शिवाय भलतेच गहन आहे.

गहन आणि भयंकर तर हे आहेच, पण विश्वास ठेवा · वा न ठेवा, प्रयोगात या भयंकराने एकीकडे अंगावर काटा येत असतानाच आम्ही हसत होतो. शेवटचा पेंढा भरलेल्या नवऱ्याच्या, कपाटावाटे झालेल्या चित्तथरारक ' एंट्री 'ला तर सारा प्रेक्षकवर्ग अक्षरशः आपल्या राजा गोसावी नाहीतर शंकर घाणेकरांची ' एंट्री ' झाल्याप्रमाणे पोटे धरधरून हसला. एखाद्या फार्समधल्यासारखा हा प्रसंग रंगला.

हे नवीन नाही. भयंकर आणि हास्यास्पद यांचे असे विक्षिप्तपणे रंजक मिश्रण पाश्चात्त्य चित्रपटांतून आणि नाटकांतून याहीपूर्वी यशस्वीपणे सादर करण्यात आलेले आहे. ' आर्सेनिक अ‍ॅण्ड द ओल्ड लेस ' हा कॅरी ग्रँटचा गाजलेला जुना विनोदी चित्रपट या प्रकारचा होता. तो ज्यावर आधारला होता ते मुळात लोकप्रिय नाटकच होते. त्यात अनेक मुडदे होते. फ्रँकेन्स्टीनसारखे पडद्यावरचे नरराक्षस विनोदी जोड-गोळ्यांबरोबर एकत्र आणून हॉलिवुडने अनेक कमजास्त यशस्वी हास्यपट तयार केलेले आहेत. हिचकॉकच्या चित्रपटांतूनही फार भयावह प्रसंगांत तो आपल्याला मध्येच गदगदून हसवतो. अलीकडचे आयनेस्क-बेकेटसारखे अतिनव पाश्चात्त्य नाटककार तर ज्यातून सुटका नाही अशा हरप्रकारच्या चित्तथरारक संकटात अडकलेल्या पात्राद्वारे प्रेक्षकांना हसवीत ठेवतात. अर्थात या ' नव ' मंडळीचे हे हसवणे वाटते तितके निखळ आणि उथळ नसते. त्या आडून त्यांची हातखंडा, एकूण अस्तित्वाची गुदमरून टाकणारी निरर्थकता जाणवत असतेच.

' ओ डॅड, पूअर डॅड ' या अर्थपूर्ण निरर्थकतावादी नाटकांच्या जातीतले नाही. परंतु ते अगदीच एक सरळसाधे हास्यक देखील नाही, हे कथानकावरून कळून येईल.

हसल्यानंतर थिएटरबाहेर पडून विचार करू गेले म्हणजे त्यातील काही मेखा लक्षात येतात. पहिली मेख ही की, या नाटकातले तमाम पुरुष कमजास्त नालायक आणि निकामी आहेत. तमाम स्त्रीवर्ग आक्रमक, तेज आणि पुरुषासाठी भुकेलेला

आहे. पुरुष स्त्रीला मूल देतो ते सूडबुद्धीने; आणि ते पुरुषच असते. बारा बारा महिने ते दात येईस्तोवर पोटात राहते. नाइलाजाने जन्मते आणि नवा नालायक बनते. कोणती तरी स्त्री त्याची कर्तुमकर्तुम मालकीण होते आणि कधी त्याच्यासाठी दोन लढाऊ स्त्रियांत लढत देखील होते.

## पारंपारिक कल्पनांना धक्के

माशाची मांसाहारी मादी, माश्या खाणारे झाड, ही स्त्रीची प्रतीके. पेंढा भरून टांगलेला 'डॅड' हे पुरुषाचे प्रतीक.

परंतु प्रसंगी हा कुचकामी पुरुष बघता बघता जोनाथनप्रमाणे खूनदेखील करून मोकळा होतो. या कर्तृत्वहीन, भयगंडाने ग्रस्त, शेपटीघालू प्राण्यात हिंस्रतेची सुप्त पण निश्चित बीज आहेत. उलट स्त्री लढाऊ आणि आक्रमक आहे पण कुठे तरी तितकीच केविलवाणी आहे.

हे अर्थात संपूर्ण वास्तवाचे प्रतिबिंब नव्हे. हे या नाटकाचे स्वतंत्र जग आहे. यात एकांगीपणा आहे. कर्तुमकर्तुम, हम करेसो कायदा पुरुष आणि जातीच्या गाई अशा पडखाऊ बिच्चाऱ्या बायका हे आपल्या परिचयाचे पारंपरिक चित्र यात कुठेच नाही. याच नाटकाचे कशाला, आपल्या विनोदी नाटकांतूनदेखील हुकूमशहा बायको आणि पडखाऊ नवऱ्याचीच चित्रे फार आढळतात. याचे एक कारण म्हणजे वास्तवातल्या तुम्हाआम्हांला हे उफराटे, क्वचितच दिसणारे चित्र मोकळेपणी पाहून हसता येते. तेच, वास्तव चित्र, कितीही विनोदी उभे केले तरी, आपण त्याला हसण्याला सहजासहजी राजी नसतो. याचबरोबर हेही खरे की आपल्या विनोदी नाटकातले हे ठरीव दाम्पत्यच मुळी पाश्चात्त्य– विशेषकरून फ्रेंच विनोदी नाटकांमधून आपण मागे केव्हा तरी दत्तक घेतले आहे; आणि आता ते आपल्या सवयीचे झाले आहे. 'ओ डॅड' मधली स्त्री आणि पुरुष दोन्ही त्या नाटकाप्रमाणे सरळच पाश्चात्त्य आणि फ्रेंच आहेत. त्यातही ती युद्धोत्तर पाश्चात्त्य किंवा खरे म्हणजे युरोपीय परिस्थितीची प्रतीके वाटतात. गेल्या महायुद्धानंतर युरोपात पुरूष घटले, स्त्रिया बहुसंख्य झाल्या. परिणामी अल्पसंख्य दुर्मिळ पुरुषांची जणू शिकार स्त्रिया आपल्या भुकेच्या तृप्तीसाठी करू लागल्या, आपापसांत पुरुषासाठी झगडू लागल्या, पुरुष अर्थातच तात्पुरता तरी दुय्यम आणि भोग्य वस्तू बनला.

या विलक्षण परिस्थितीचे एका हास्यस्फोटक, विक्षिप्त पद्धतीने केलेले चित्रण म्हणजे 'ओ डॅड, पूअर डॅड'. नव्या स्त्री–पुरुष-संबंधाच्या या चित्रणात लैंगिकता महत्त्वाची ठरणे अपरिहार्य होते; तशी या नाटकात ती आहेच. प्रतीकांची योजना आहे ती याच संदर्भात.

पुरुषाला इतउप्पर कोणतीही आशा नाही, त्याला पेंढा भरून टांगूनच घ्यावे लागणार हा या विक्षिप्त नाटकाचा म्हटला तर काहीसा गंभीर, म्हटला तर विनोदी बोध. आपल्याकडे पेंढा भरून टांगून ठेवण्याचे पुरुष पांढरपेशा आणि उच्च वर्गात

आजकाल बरेच दिसू लागले असले तरी अद्याप स्त्रीचे वर्चस्व–संख्येनेदेखील नाहीं तोवर आपल्या पुरुष मंडळीला आशेला बरीच जागा आहे. अद्याप त्याचा चढलेला स्वर कित्येकदा आख्खे घर (स्त्रीवर्ग समाविष्ट) गोळा करतो. परंतु ज्या प्रेक्षकवर्गापुढे अॅलेक पदमसींनी हे नाटक सादर केले त्या वर्गाला मात्र या नाटकात ओळखीच्या पुष्कळच खुणा सापडल्यासारख्या होत्या. त्याने या भय-हास्ययुक्त नाटकाचा भरपूर आस्वाद घेतला. (या वर्गासाठी अधिक आकर्षण म्हणून या नाटकातले फॅशनेबल पोशाख एका कापड गिरणीने मुद्दाम विनामूल्य पुरवले होते.)

## यशस्वी प्रयोग

युरोपात आज केली जात असलेली नवी विनोदी नाटके साधारणत: कशी आहेत याचा मासलाच या नाटकाच्या निमित्ताने मुंबईच्या रंगभूमीवर आला.

'थिएटर ग्रुप'च्या प्रयोगात दिग्दर्शक अॅलेक पदमसींचे सारे तांत्रिक कसब प्रतीत होत होते. प्रयोग अवघड असूनही अगदी निखळ आणि निर्दोष वाटला. मूळ नाटकाचा विक्षिप्तपणा या प्रयोगाने चांगला पेलला. प्रकाश–ध्वनी–नेपथ्य–पोशाख-अभिनय या सार्‍यांचा एकजीव आणि चपखळ मेळ आरंभापासून अखेरपर्यंत बसलेला होता. वेगळे असे जाणवलेच नाही.

हे फ्रेंच नाटक बव्हंशी पारसी–ख्रिश्चन नटसंचाने लीलया केले. स्वत: अॅलेक पदमसी (एका हॉटेल नोकराच्या भूमिकेत) सोडून पर्ल पदमसी (मादाम रोज-पेट्ल) आणि बबल्स पदमसी (दुसरा हॉटेल नोकर) हे दोन आणखी पदमसी कुटुंबीय या प्रयोगात होते. पर्ल पदमसींनी आपली गुंतागुंतीची मातब्बर भूमिका पुष्कळच यशस्वी केली. सिल्व्हेस्टर व कुन्हा (कमांडर रोजअबव्ह) आणि रघुसुदन (जोनाथन) हे या नटसंचातले आणखी दोन गुणी नट. फटाकड्या रोजालीच्या भूमिकेत देखण्या साबिरा मर्चंट तोकड्या कपड्यात मोकळेपणी वावरल्या आणि या प्रयोगाचे स्वतंत्र आकर्षण ठरल्या.

परंतु सर्वांत श्रेष्ठ भूमिका झाली ती पेंढा भरलेल्या 'डॅड' ची ! नको त्या क्षणी कपाटातून शैय्येवर ओंडक्याप्रमाणे सरळ आडव्या पडलेल्या या निष्प्राण 'डॅड' चे सजीव, हसतमुख दर्शन नाटकानंतर लगेच रंगमंचावर इतर नटांसमवेत होताच आम्ही प्रेक्षकांनी हातांना मुंग्या येईस्तोवर टाळ्या हाणल्या. या नटाचे नाव जाहीर करण्यात आले नव्हते; पण त्याचीच भूमिका सर्वांत महत्त्वाची होती ना ! ती पडती (किंवा खरेतर न पडती !) तर नाटक पडले असते.

असा हा 'पूअर डॅड'

O

एक इमारत......

कुबड निघालेल्या, थकल्या आजीसारखी बसकी... जुनी, जीर्ण तिच्या परिसरात किती तरी मोठमोठे वृक्ष, वड, पिंपळ; त्यांच्याही वयाचा अंदाज घेणं मुष्कील. त्या विशाल पण जुन्या वृक्षांच्या छायेत ती बसकी इमारत एखाद्या लांबट चाळीसारखी दिसत होती. तिच्यापुढे छोटीशी बाग. मोडकळीस आलेल्या जीर्ण गेटवर पाटी... 'हॉऊस फॉर एजेड् अ‍ॅण्ड ओल्ड;' ती पण जुनाट. तिची अक्षरं पण पुसट झाली होती.

एरव्ही सगळं कसं स्तब्ध आणि शांत होतं.

रविवारचा दिवस... त्या शांततेला शेजारच्या चर्चमधल्या घंटेमुळं जाग आली...

एक म्हातारी... कृश... सुरकुतल्या चेहऱ्याची पुनः पुन्हा

# देवाची दया

इमारतीच्या पुढे बागेत यायची, दूर लांबवर असलेल्या गेटकडे पाहायची व परत येरझारा घालायला लागायची.

थोडया वेळानं तिनं डोळयावरचा निकल फ्रेमचा चष्मा काढला, त्याची काच रुमालानं साफ केली व तो परत डोळयावर लावला.

येरझारा घालून घालून ती थकली. परत खोलीत गेली अन् आरामखुर्चीत अंग टाकून स्विंग् घेत राहिली विचार करीत ..

शेजारच्या खोलीतून काठी टेकीत कुबडी म्हातारी तिच्या दाराशी आली, अडखळत .. क्षीण आवाजात म्हणाली, "एम्मा !"

"कोण ? मेरी ! ये."

"आज जरा नाराज दिसयेयस् ?"



"अजून सॅम्युएल आला नाही, नं ?"

"अग, काही अर्जंट काम निघालं असेल त्याचं..."

"नाही ! तसं असतं तर त्यानं मला कळवलं असतं..."

"एम्मा, तू भाग्यवान आहेस." त्यावर एम्मा चूप राहिली. मेरी पुढे बोलायला लागली, "बघ. दर रविवारी तुला बघायला तुझा मुलगा येतो. किती आस्थेनं तुझी विचारपूस करतो. तुला निकडीच्या वस्तू आणून देतो. आला म्हणजे फुलं आणतो. नाहीतर एक मी ! मेलीय् का जिवंत आहे हे बघायलाही कुणी येत नाही."

"नाही मेरी. अशी निराश होऊ नकोस. पुरुष–माणसाना उभ्याउभी येणं जमतं. पोरगीच आहे ना तुझी ? परावलंबी जीवन असतं बायकाचं. संसार, सासू, सासरे, नवरा, मुलं सगळं सांभाळून घडीघडी येणं कसं जमेल तिला ?"

"होऽऽ बाई, एवढ्याकरिताच देवानं एक तरी मुलगा द्यावा." मेरी रडवेला.

------

**शांताराम**

------

चेहरा करून म्हणाली. एम्मा तिच्याजवळ गेली. तिच्या खांद्यावर हात टेकीत म्हणाली,

" निराश होऊ नकोस, मेरी सगळ्यांकडे लक्ष देणारा ईश्वर आहे... आज चर्चला जाऊन आलीस का ?"

" हो. सकाळीच गेल्ये होत्ये. तू नाही दिसलीस ?"

" रविवारी माझा मुलगा येतो ना. सॅम्युएल ? त्याचीच वाट पाहात राहिल्ये रविवारी आम्ही मिळून चर्चला जातो. काय झालं कुणास ठाऊक ? आज आलाच नाही."

" येईल ग, गाडी बिडी चुकली असेल !"

...एम्मा अन् मेरी तशा रोजच भेटायच्या, कितीतरी वेळ बोलायच्या, पत्ते. खेळत बसायच्या. त्याचाही कंटाळा आला; तर बागेत जाऊन बसायच्या.

पण मेरीनं ओळखलं – आज एम्मा मनःस्थितीत नाही. ती जायला निघाली. जाताना एम्माला म्हणाली, " ये थोड्या वेळानं. चहा ठेवल्येय् मी !"

" बरं." मेरी गेल्यावर एम्मानं वर्तमानपत्र चाळलं. त्यातही तिचं मन लागेना. दारात उभी राहून ती पुन: लॉनवर गेटकडे पाहू लागली.

तेवढ्यात एक टॅक्सी कम्पाऊंडच्या गेटजवळ थांबली. उंचापुरा, निळा सूट घातलेला पस्तीसएक वर्षांचा एक माणूस हातांत फुलं घेऊन तिच्यातून उतरला. टॅक्सी आली तशी निघून गेली. एम्मानं नाकावर आलेला चष्मा वर डोळ्यावर चढवीत त्याच्याकडे पाहिलं. सॅम्युएलच होता तो – तिचा बाळ, सॅम्युएल. धावतच तो तिच्याकडे, खोलीकडे आला. म्हातारी आनंदित झाली. येता येऊन त्यानं आईला मिठी मारली... " आईऽऽऽ..." हातांतली फुलं तिला देत म्हणाला, " उशीर झालाय मला यायला, आई, माफ कर. तुला ताटकळत ठेवलं मी आज !"

" हरकत नाही; आलास ना ? तेच पुष्कळ झालं मला. तुला आठवड्यातून एकदा पाहिलं तरी समाधान वाटतं." थोडा वेळ थांबून ती पुढं म्हणाली, " आज मुलांना नाही रे आणलंस ?"

" मुलांची आई त्यांना घेऊन बाहेर गेलीय्, कुठेतरी .."

" आमच्या सूनबाई कशा आहेत ?"

" बरी आहे. आई – तू खरंच थोर आहेस ! दर वेळेस किती आस्थेनं तिची चौकशी करत्येस ? अन् ती बघ ?... तुला शब्दानंही विचारीत नाही."

" कोणी विचारो न विचारो; आपण आपलं काम करावं."

" तीच थोडी समजदार असती तर .. तर कशाला तुला इथं ठेवावं लागलं असतं – दूर... सगळ्यांपासून वेगळं ?"

" असू दे रे बाबा, माझं तुमच्या घरात असणं तिला आवडत नाही त्याला तू तरी काय करणार ? आणि जवळ राहून उगाच कलह माजवण्यापेक्षा लांब राहून

बरं असणं चांगलं नाही का ? तू येतोस. पोरांना आणतोस. तेव्हढंच पुरे आहे माझ्यासाठी. अन् आता माझे दिवसही किती राहिलेत ? हेही निघून जातील !" असं म्हणतच एम्मानं एक दीर्घ सुस्कारा सोडला.

"आई, आज चर्चला गेली नव्हतीस ?" विषय बदलायच्या उद्देशानं सॅम्युएल म्हणाला.

"नाही बाळ, आज तुझीच वाट पाहात राहिल्ये."

"बघ – प्रयत्न करूनही लवकर निघता आलं नाही घरातून आज. येताना तिचं आणि माझं थोडं भांडण झालं."

"भांडण ?"

"हो."

"आता कशाला रे, भांडण हवं ? नवरा–बायको दोघंच. राजाराणीचा संसार. देवदूतासारखी दोन निष्पाप पोरं. सुख आणखी हवंय तरी काय ?"

"दुःख आहे ते हेच, आई ! सगळं आहे. पोझिशन, वैभव; पण माणसाचं मनच जोवर समाधानी नाही, तोवर त्याला सुख लाभणार नाही."

"तिला हवंय तरी काय ?"

"तेच कळत नाही ! तिला तू नको होतीस. म्हटलं उगीच भांडणं नकोत. म्हणून इच्छा नसतानाही मी तुला वेगळं ठेवलं. वाटलं होतं – आता तरी ती बरी राहील; पण नाही... तिचं पुनः तेच !"

"म्हणजे ?"

"असू दे, आई, माझ्या नशिबी सुख नाही एवढं मात्र खरं !"

"का रे, बाबा ? तू दुःखी राहिल्यानं मी तरी सुखी होईन का ?" असं म्हणतच तिनं रुमाल डोळ्याला लावला.

"आई, रडू नकोस. तुझ्या किंवा माझ्या रडण्यानं परिस्थिती बदलणार नाही. मीच गप्प राहतो. सारासार विचार करतो म्हणून बरं आहे. नाही तर... संसाराचे तीन तेरा केव्हाच झाले असते."

"म्हणतोस तरी काय तू ?"

"हो... आई, खरं आहे हे ! कुणास ठाऊक किती दिवस चालेल असं ?"

बराच वेळ कुणीच काही बोललं नाही. विषय बदलायच्या उद्देशानं पुनः एम्मानंच सुरुवात केली, "छोटा बेंजामिन कसा आहे ?"

"बरा आहे. सारखी आठवण करतोय तुझी. परवा त्याच्या आईला म्हणाला, 'मी आजीला आणायला जातो'–"

"खरंच ?" एम्मा आनंदून म्हणाली.

"हो. तर माहीत आहे त्याच्या आईनं काय केलं ?"

तिच्या क्षीण निस्तेज होऊ पाहणाऱ्या डोळ्यांत प्रश्नार्थक चिन्ह उभं राहिलं.

"एक चपराक तिनं त्याच्या गालफडात ठेवून दिली अन् तो रडत राहिला."

"अरेरे ऽऽ अशी का करत्ये रे ही ?" एम्मा म्हणाली.

"कुणास ठाऊक !"

तेवढ्यात मेरी आली. तिनं सॅम्युएलला येताना पाहिलं होतं. चहा तयार करून ठेवला होता. म्हणाली... "चल एम्मा. लेकरालाही आण तुझ्या, हं !"

"चल बाबा !" म्हणत एम्मा उठली.

मेरीकडे ते बराच वेळ बसले. बराच वेळ त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. गोष्टीनं गोष्टी निघाल्या. पुन्हा सूनवाईवरून ओळखीनं ओळखी निघाल्या.

सॅम्युएलची बायको रीटा, मेरीची परिचित निघाली. रीटाची आई मेरीच्या लांबच्या नात्यातली लागायची.

रीटाच्या आईविषयी बोलताना मेरी म्हणाली,

"रूपानं खरंच सुंदर होती ती. पण स्वभावानं ? मोठीच विचित्र ! फार अहंमन्य ! स्वतःच्या रूपाविषयीच्या तिच्या कल्पना शिगेला पोचल्या होत्या. ह्या जगात रूपच सगळं काही नाही ! माहीत आहे— ? रीटाच्या बापानं तिच्या त्या स्वभावापायीच आत्महत्या केली होती !"

"खरंच ?" एम्मा म्हणाली, "तुला माहीत होतं बाळ, हे ?" सॅम्युएलला उद्देशून ती म्हणाली.

"होय... पण... त्याचं कारण रिटानं मला वेगळंच सांगितलं होतं."

"काय म्हणाली होती ती ?" —मेरी.

"ती म्हणायची तिचा बाप म्हणे अनकष्टी होता. बायकोचं अन् पोरीचंसुद्धा पोट पोसणं होत नसे त्याच्याच्यानं. नुसता दारूच्या नशेत झिंगून पडला राहायचा." —सॅम्युएल म्हणाला.

"दारू प्यायचा ?" आवाज चढवीत मेरी म्हणाली, "अन् मी म्हणत्ये माणूसच आहे ! दारू प्याला तर काय झालं ? म्हणून काही कोणी निंदेला पात्र ठरत नाही. तो अनकष्टी होता असं म्हणण्यात मुळीच तथ्य नाही. पगार पुरत नव्हता म्हणून सुटीच्या दिवशीसुद्धा बिचारा लहान मोठी कामं करायचा. तीच रांड तशी होती. हलकट मेली ! नवरा मरताच दुसऱ्याचं घर धरलं."

"असू दे, मेरी; असू दे, बाई ! काय करायचंय ह्या गोष्टीशी आम्हाला ? उगाच कशाला बाप अन् आई काढा ? अन् बापाचं न् आईचं दूषण पोरीला तरी का लावायचं ? ती बरी आहे ना ? तेच पुष्कळ झालं आम्हांला." एम्मा निर्धारानं म्हणाली.

सॅम्युएल त्यांच्या गोष्टी चूप ऐकत होता.

तो निघाला तेव्हा त्याच्या मनात रीटाचे अन् रीटाच्या आईचेच विचार चालले होते. राहून राहून त्याच्या मनात स्त्रीजातीचे विचार येत होते. ...स्त्री मनात आणील तर घर स्वर्ग करून देईल; नाही तर... ?

स्वत:लाही तो धिक्कारीत होता... आपणच मूर्खपणा केला... रीटाच्या मोहात पडलो... रूपाचा मोह? रूपच सगळं काही नसतं? किती सालस पोरी सांगून आल्या होत्या आपल्याला?... पण कुणाचं एक ऐकलं नाहीं. आईचं पण नाही... पण... पण आता बराच लांबवर आलोय... दोन मुलं आहेत... संसाराची वासलात लावण्यात, हसे करून घेण्यात काही अर्थ नाही. लोक काय म्हणतील?... मलाच मूर्खात काढतील... झाकली मूठ सव्वालाखाची.

दिवसानंतर दिवस गेले भुर्रकन.

पुन्हा रविवार आला.

एम्मा पुन्हा वाट पाहू लागली. तिला खात्री होती – सॅम्युएल मुलांना घेऊन येईल म्हणून. तिनं त्यांच्या जेवायचा प्रबंध करून ठेवला.

सकाळ गेली–

दुपार अन्...

संध्याकाळ पण! सॅम्युएल आलाच नाही. स्तब्ध पिंपळाच्या विशाल वृक्षाखाली ती कितीतरी वेळ बसून होती – वाट पाहात. बघता बघता सगळा आसमंत अंधारात विरघळला, तेव्हा ती खोलीत परतली. न जेवताच प्रभुनाम घेत झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच मेरी आली. तेव्हा एम्मा नुकतीच उठली होती. म्हातारी मेरी तिला म्हणाली– "मुलगा आला नाही वाटतं काल?"

"नाही, बाई. नाही आला."

मेरीनं वर्तमानपत्रातल्या ठळक ठळक बातम्या वाचल्या.

नंतर एम्मानं चहा केला. मेरीला दिला. दोघीही थोड्या भटकून आल्या. जाताना पुन्हा मेरीनं एम्माला सूनबाईविषयी विचारलं–

"एम्मा ही मुलगी तू पसंत का ग केलीस?

"नाही बाई! त्यांनीच आपसात ठरवलं होतं. लग्नाबद्दल आधी मी सॅम्युएलला विचारायची. त्यावर तो म्हणायचा– 'मी लग्नच करणार नाही' – पण नंतर तो आपण होऊन म्हणाला–'मी करतोय' म्हणून मुलगी पण त्याच्याच पसंतीची. एक दिवस तिला माझ्याकडे घेऊन आला. नाकी डोळी सुंदर पोरगी – मला आवडली. सॅम्युएल तिच्या मोहातच पडला होता. लग्न उरकून टाकलं त्याचं!"

"अन् पुढं तिनंच तुला घराबाहेर काढून दिलं?"

एम्माला तिचं ते म्हणणं बोचलं पण चेहऱ्यावर त्याची मुळीच प्रक्रिया न दाखवता. ती मेरीला म्हणाली, "नाही मीच तसं सॅम्युएलला म्हटलं. उगाच माझ्यावरून त्यांची भांडणं व्हायची. सॅम्युएल समजूतदार! तळव्यावर फोड झाला म्हणून कुणी हात कापत नाही. त्यानंच उपाय शोधून काढला अन् माझं किंवा तुझं काय? – आता फक्त दिवसच मोजायचेत ना? कुठंही दोन घास खायचं आणि पडून राहायचं!"

"माझा मुलगा असता तर मी नक्कीच इथं आले नसते, एम्मा."

"मेरी, प्रत्येकाच्या स्वभावावर आहे ते. मला तरी घरात कलह आवडत नाही. घर कसं आनंदी असावं! वातावरण घरातलं नेहमी प्रसन्न राहावं. Home sweet home! सूनबाईला वाटायचं माझ्या घरात राहण्यानं ती सुखी नाही. अन् मी तरी दुसऱ्याच्या दुखाःला कारणीभूत का व्हावं? माझा बाळ समजदार. त्यानं माझी सोय लावून दिली. देवाची दया म्हणून अन्नाला महाग नाही झालो आपण!"

"तू काही म्हण, एम्मा, आजकालच्या ह्या पोरी फक्त मिरवतात. जबाबदारी कशी त्यांना समजत नाही. घरातल्या वडील माणसांचा – एव्हढंच काय (?) नवऱ्याचासुद्धा धाक नाही राहिला त्यांना. नाहीतर आमच्या काळात?"

"तो काळ वेगळा होता, मेरी!"

"तू वाचलंस आजच्या वर्तमानपत्रात – कुण्या एका नवरोबानं त्याच्या बायकोला अन् मुलांना जिवानं जाळून टाकलं म्हणे?"

"काय म्हणत्येस तू?"

"हो. हे असंच व्हायचं आता! आम्ही आमच्या काळात नजरेनं दबत होतो. असे प्रकार ऐकिवात नव्हते."

"कुणी मूर्ख माणूस असावा तो. अगदीच वेडसर. शहाण्या माणसाच्या हातून असं कृत्य कधीच व्हायचं नाही."

"अन् त्याला तसं करायला प्रवृत्त करणारी बायको तरी शहाणी आहे का?"

"नाही मेरी, मी तसं म्हणत नाही. टाळी एका हातानं वाजत नाही. बायकांना माणसापेक्षा जास्त समज पाहिजे."

"तेच मी म्हणत्येय." मेरी म्हणाली व एम्माला तिच्या खोलीपर्यंत पोचवून ती परत गेली.

...त्यानंतर सॅम्युएलचं पत्र पण आलं नाही. असं कधी झालं नाही. तो रविवारी आला नाही तर सोमवारी किंवा मंगळवारी त्याचं तसं पत्र यायचं. ती काळजीत पडली.

दिवसांमागून दिवस गेले आणि पुन्हा: एक रविवार आला.

सॅम्युएल मात्र आलाच नाही. अन् एक दिवस ती चर्चच्या फादरला सांगून आली. "फादर, माझा सॅम्युएल दोन रविवार झाले आला नाही. असं आतापर्यंत झालं नाही. फार काळजी वाटत्येय."

फादरनं चौकशी करायचं आश्वासन दिलं.

अन् एक दिवस तिच्याकडे फादर आला व म्हणाला, "चल, एम्मा, आपणच त्याला भेटून येऊ."

पोराच्या भेटीसाठी एम्मा व्याकुळ झाली होती. जाताजाता तिनं फादरला शंका

विचारली, "कुठं आजारी तर झाला नाही तो ?"

"नाही. तो एवढ्यात अडचणीत सापडलाय. म्हणूनच तुला भेटायला नाही आला."

"कोणती अडचण आहे त्याची ?"

"तीच तर विचारायला चाललो आहोत आपण."

"कुठं ?"

"जेलमध्ये !"

"म्हणजे, काय तो जेलमध्ये आहे ?"

"हो !"

"का ?"

"त्याच्या हातून गुन्हा घडलाय."

"कसला ?" अधीर झाल्यागत एकामागून एक प्रश्न ती विचारीत होती फादरला सगळं माहिती झालं होतं पण सांगावं की सांगू नये हे त्यालाही कळत नव्हतं. त्यानं सांगून टाकलं – सत्य

"त्यानं तीन जिवांची हत्या केलीय् – बायको न् दोन मुलं."

"नाही. फादर हे शक्य नाही. माझा सॅम्युएल तसा नाही."

"एम्मा दुर्दैव हेच आहे की हे खरं आहे."

तिनं त्यावर निष्ठून सांगितलं, "नाही हे खोटं आहे."

त्यावर मात्र फादर चूप राहिला.

फादर आणि एम्मा जेलच्या परिसरात येऊन पोचले. फादरला भीती वाटत

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

होती – कुठे एम्मा कोलमडून पडणार तर नाही ? सांभाळीतच फादर तिला घेऊन गेला. त्यानं तिला बाजूलाच एका बेंचावर बसायला सांगितलं. देवाचं नाव घेत ती तिथेच बसून राहिली.

आधी फादर एकटाच सॅम्युएलला भेटायला गेला. फादरला पाहताच सॅम्युएलचा चेहरा उजळून निघाला. विषादाची कोणतीच छटा त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती. फादरनं त्याच्या डोक्यावर हात ठेवून त्याच्याकरिता प्रार्थना केली.

"फादर, आई कशी आहे ?" न राहवून सॅम्युएलनं विचारलं.

"आली आहे !"

"कुठं ? इथं ?"

"हो."

"कशाला सांगितलंस तिला ? अन् आणलंत तरी कशाला ? आधीच ती कमजोर ! सहन होईल का तिच्याच्यानं हा शॉक् ?"

"वेदना तिनं पचवल्या आहेत. सहनशक्तीला सीमा नाही तिच्या. मला त्याची खात्री होती. म्हणूनच इथवर आणलं तिला, थांब तिला बोलावून आणतो."

लांबूनच फादरनं एम्माला जाड गजाच्या आंत बंदिस्त तिचा मुलगा दाखवून दिला. अन् त्याला काय वाटलं. कुणास ठाऊक तो लांब दूरवर जाऊन उभा राहिला.

आईचा चेहरा पाहून सॅम्युएलला रडू आलं. ती त्याच्या जवळ गेली तेव्हा तिच्या डोळ्यांत अश्रूंच्या धारा लागल्या होत्या. त्याचे हात घट्ट कवटाळीत ती हुंदके देत अडखळत थांबत म्हणाली,

"हे काय केलंस, माझ्या सोन्या ?"

आईचे डोळे पुसत तो म्हणाला, "आई, हे कधीतरी व्हायचंच होतं. जरा घाईत झालं. थोडं अविचारानं झालं एवढंच !"

"का मारलंस रीटाला ? पोरांनी काय केलं होतं तुझं ?"

"सांगतो. तुलातरी समजावून देऊ दे, आई ? माझं जगातलं सगळ्यात मोठं श्रद्धास्थान तूच आहेस. तुझ्यापासून मी काही काही लपवणार नाही. शपथेवर सांगतो, आई. मी फक्त रीटाला मारलं."

"पण सगळं जग म्हणतंय् तू तिघांना मारलंस म्हणून. तशी तू कबुली पण दिलीय् म्हणे."

"हो, मी आजवर कोणालाच सांगितलं नाही. फक्त तुलाच सांगतो. आई, अन् तुला विनवून सांगतो, तू कुणाला सांगू नकोस... आईऽऽ आईऽऽ मी रीटाला मारलं. कारण ?... कारण तिनं माझ्या निष्पाप दोन पोरांना जिवानं मारलं."

"म्हणजे ?" ती आश्चर्यानं म्हणाली, रडतच.

"बऱ्याच उशिरा माझ्या लक्षात आलं, आई. तिचं माझ्यावर प्रेम नव्हतं. माझ्या मुलांवरही नव्हतं. तिच्या ऑफीसमधल्या गृहस्थाबरोबर मी तिला कितीदा

तरी लपून चोरून पाहिलं. कधी सिनेमात, तर कधी बाजारात तर कधी हॉटेल-मध्ये. मी चूप होतो. बोलत नव्हतो. अन् एक दिवस मी तिला विचारलं. स्पष्टच विचारलं. त्यावर ती चिडून मलाच उलटं सीधं बोलायला लागली. मी तेही सहन केलं. आणखी म्हणाली, 'तू माझ्यावर पाप लावतोस!' तेच मी केलं नव्हतं. आई, खरं सांगतो मी तिच्यावर पाप लावलं नव्हतं. मला तिच्याकडून फक्त खुलासा हवा होता. त्याच घरात मी आगीच्या फोफाट्यात असल्यासारखा राहात होतो. माझे संबंध तिच्याशी दुरावत होते. अन् एका रात्री ती आलीच नाही. त्याच्या सोबत जाऊन राहिली. कुठं ते मला अजून माहीत नाही. मीच तिच्या मार्गात होतो. एकदा तिला स्पष्ट म्हटलं, 'तुझी इच्छाच असली अन् तुझं खरंच त्याच्यावर प्रेम असेल तर मी तुझ्या मार्गात येणार नाही. तू त्याच्याकडे जाऊ शकत्येस.' मी तिला नको होतो. माझी मुलं नको होती. आम्ही तिच्या मार्गातून निघून जायचं ठरवलं. तिनं त्यानंतर मला वाटतं तिच्या प्रियकराला जाऊन तसं विचारलं. त्यांचं आप-सांत काय झालं ते कळलं नाही." इथे सम्युएल थांबला. थोडा वेळ थांबून परत त्यानं सुरुवात केली.

"एक दिवस मी कामाहून परत आलो. पाहतो तर माझ्याकडे पाहून ती वेड्या-सारखी हसत होती. मी तिला विचारलं "मुलं कुठं आहेत?" तिनं बोटानंच खोलीकडे अंगुलीनिर्देश केला. खोलीला बाहेरून कडी लावली होती. 'काय करताहेत?' मी विचारलं, त्यावर ती म्हणाली – 'खेळताहेत' अन् परत हसायला लागली. मी दार उघडून पाहतो... तो काय? माझा माझ्या डोळ्यांवरच विश्वास बसला नाही. आई, ती इवलाली पोरं हिरवीगार पडली होती. तिनं त्यांना विष दिलं होतं हे चटकन माझ्या लक्षात आलं. माझं रक्त खवळून उठलं. मी मी राहिलो नाही. एका विजयोन्मादात असल्यासारखी ती माझ्याकडे पाहून पुन्हा हसली. तिला मी नको होतो. माझी होती म्हणून ती मुलं पण नको होती. कशी आई होती ती कुणास ठाऊक? तिनं त्यांना मारून टाकलं. मी तिला आढतच आत नेलं. मला तिच्या ह्या कृत्याचं समर्थन हवं होत. अन् ती हसतच होती. मी चिडलो. माझ्याही अंगात भूत संचारलं होतं. मी काय केलं ते माझं मलाच कळलं नाही अन् का केलं तेही कळत नाही.

"खोलीला बाहेरून कडी लावून मी वेड्यासारखा धांवत सुटलो. भर रस्त्यात–बाजारांतून आणि कुठंतरी पडलो."

शुद्धीवर आलो तेव्हा कळलं. माझं घर साफ जळून गेलं. ती पण अन् माझी ती निष्पाप पोरं पण. खरं-खोटं, पाप-पुण्य सगळंच राख झालं.

"आई, मी तिला मारलं कारण तिनं माझ्या मुलांना मारलं." आता तोही रडत होता अन् एम्मा पण.

"अरे, मग कायद्यापुढं तू खोटं का बोललास? तीन जिवांच्या हत्येचा बोल

स्वतःवर का लावून घेतलास ?"

"मला पण जगायचं नव्हतं. आणि खरं सांगूनही कोणाला खरं वाटलं नसतं. किती झालं तरी ती माझ्या पोरांची आई होती – आई, जगानं तिच्या माथी स्वतःच्या पोराच्या हत्येचा कलंक लावावा ? – मला ते नको होतं." अन् पुन्हा गहिवरून सद्गदित सजल नेत्रानं तो म्हणाला, "माझ्या लेकरांची तो माय होती, आई, ती माय !"

"बेटा!! " म्हणून तिनं त्याचं तोंड कुरवाळलं. त्याचा मुका घेतला. नंतर ती फार वेळ उभी राहू शकली नाही. तिथंच कोलमडून पडली.

फादर तिला परत घेऊन गेला.

अजूनही दर रविवारी एम्मा कपडे करून तयार राहते. बागेत सारख्या येरझारा घालते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत पाहात राहते.

थोडचा वेळानं मेरी येते. तिचा हात धरून एक शब्दही न बोलता तिला तिच्या खोलीत घेऊन जाते. दिवा लावते. त्याची वात मोठी करते. एम्माला बिछान्यावर झोपवते.

ती इमारत... थकल्या आजोसारखो दिसणारी, अंधारात विरघळू पाहते.

शांत वातावरणाला तडा जातो – ती मेरीच्या शब्दाने एम्माच्या पायाशी बसून ती बायबल वाचीत असते...

......"O, Give thanks unto the Lord :
for he is good; because His mercy endureth
for ever......
The Lord is my strength and song,
and is become my salvation....... ○

---

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्या संबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून डिसेंबर १९६८ पर्यंतच्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने या पुढील कवितांची दखल घेणे, किंवा त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे जवळ जवळ अशक्यच आहे. तसेच 'माणूस'कडे पाठवलेल्या लेखासोबत पुरेसे टपाल हशील जोडावे.

*– संपादक*

# उपेक्षित जीवनांचे 'स्वगत' कलाबद्ध करणारी कादंबरी

**वि. शं. पारगावकर**

'स्वगत' ही श्री. जयवंत दळवी यांची दुसरी कादंबरी. तशी तिसरी; परंतु 'चक्र' च्या परंपरेतील दुसरी. त्यांची पहिली कादंबरी 'चक्र' प्रसिद्ध झाली आणि खूप गाजली. त्यात विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती कादंबरी लिहिली म्हणून त्यांच्यावर अश्लीलतेचा खटला भरला गेला नाही. किंवा समाजातील डुढ्ढाचार्यांनी 'ती' वाचून अश्लील, अश्लील म्हणून हाकाटी केली नाही; कोलाहल, किंवा आक्रोश केला नाही, निदान मला तरी तसे स्मरत नाही. उलट दळवी यांच्या 'चक्र'ला हरि नारायण आपटे पारितोषिक मिळाले.

'चक्र'च्या निमित्ताने, समाजसंरक्षणाचे हाती कंकण बांधलेल्या समाजसेवकांना आणि ललित साहित्याच्या टीकाकारांना, जर नवी दृष्टी आली असेल तर त्याचे सर्व श्रेय दळवी यांना दिल्याशिवाय गत्यंतर नाही.

## स्व-गत

'स्वगत' ही कादंबरी तर श्री. जयवंत दळवी यांच्या लेखनाची चढती कमान आहे. 'चक्र' मधील दळवी यांनी चित्रित केलेले जीवन बोलून चालून झोपडपट्टीतील होते. त्या जीवनावर तथाकथित पांढरपेशा किंवा श्रीमंतीने आलेल्या संस्कृतीचे लेण चढविलेले नव्हते. शहरातील उघडी गटारे वाहावीत तसे 'चक्र'मधील जीवन उघड्याने वाहात होते. त्यात कोणाच्या अंगणातील केरकचरा होता, तर कोणाच्या संसारातील 'घाण' होती. उकिरड्यावर टाकून दिलेल्या कोणाचे रात्री केलेले पाप होते तर एखाद्या उद्धटाने उम्याने केलेल्या लघवीचा लोट होता.

समाजाच्या बंधनातून बाहेर पडलेले, तसे नव्हे तर समाजाने अव्हेरलेले; नको असताना उगवलेल्या तणासारखे ते झोपडपट्टीतील जीवन. दळवींनी ते जीवन पाहिले आणि आपल्या कलाकृतीचा विषय केले.

## ‘ स्वगत ’मधली नाती

त्यांची दुसरी त्याच परंपरेतील कादंबरी ‘स्वगत.’ परंतु त्यांच्या कादंबरीची परंपरा ‘चक्र’ चीच असली तरी जात मात्र ती नाही. ‘स्वगत’ मधील स्वगत सांगणारा शिवनाथ हरबा ओटवणे हा झोपडपट्टीतील रहिवासी नाही. तरीही पण ‘त्या’ लोकांचा हा नातेवाईक आहे. शिवनाथ हरबा ओटवणे हा एक कासाराचा मुलगा. हरबा म्हणजे नाना कासार हा हाडाचा गरीब. ‘स्वगत’ चा नायक शिवनाथ हा आपल्या बापाचं आणि आईचं नातं काय होतं ते खालील काही ओळींत सहजपणे सांगून जातो :

“खोलीत मी दाराशी झोपत असे. माझ्या पलीकडे आई झोपत असे. गॅलरीत मी आता बसतो, त्या पेटीवर नाना झोपायचे. या पेटीत ते बांगड्यांचे खोके ठेवायचे. कधी कधी मध्यरात्रीपर्यंत डबडं जळत ठेवून ते हिशेब लिहीत बसायचे. त्याच पेटीत पुढे आई कोळसे ठेवायला लागली.” म्हणजे मुलगा, बाप आणि आई यांचे संबंध कसे होते याची वरील निवेदनातून थोडी कल्पना येते.

या शिवराम ओटवणेचा बाप एका रात्री नाहीसा होतो, पळून जातो. शिवाच्या आईचं आणि तिच्या नवऱ्याचं सूतगूत नव्हतं. परंतु नेमकं काय होतं हे लहान वयाच्या शिवाला माहीत नव्हतं. नाना पळून गेल्यानंतर शेजारीपाजारी त्यांच्याविषयी बोलू लागले. शिवानं त्यांचं बोलणं खालीलप्रमाणे निवेदन केलं आहे :

“ते गेल्यावर काही दिवसांनी काही शेजारी म्हणू लागले, नानांनी आईचं काही पाहिलं असेल ! पण लोक हे असं सगळ्यांच्या बाबतीत म्हणतात. आईचं तसं काही नव्हतंच. आई चांगल्या चालीची होती. ती कधी घराबाहेर पडलेली मी पाहिली नाही, किंवा घरी कोणी आलेला दिसला नव्हता. ती निर्मळ चालीची होती. कुणाच्याही पुढ्यात मी देवावरचं फूल उचलून सांगेन. संशयालासुद्धा जागा नव्हती. तेव्हा तिचं काही नानांनी पाहिलं असेल या बडबडीत अर्थच नव्हता.”

परंतु आई शिवनाथाच्या बापाचा दुस्वास करीत होती याबद्दल मात्र शंकाच नव्हती. नाना नाहीसे झाल्यानंतर ओटवणे यांचा एक शेजारी रायाजी नानाचा फोटो मागून घेतो. परंतु नानांचा स्वतंत्र फोटो नसतो. नानांचा आणि त्यांच्या बायकोचा असा तरुणपणीचा एकत्र फोटो असतो. शिवाच्या आईने तो फोटो काढून रामजीला देण्यासाठी शिवाजवळ देते. आणि सांगते, ‘त्यांना सांगा फक्त त्यांचाच फोटो वर्तमानपत्रात छापा. माझा त्यांच्याबरोबर नको.’

“फोटोत आई सुंदर दिसत होती. आता दिसते त्यापेक्षा कितीतरी सुंदर ! फोटोत तिला पाहता पाहता मला त्या वेळी इतिहासातच्या अहल्याबाई होळकरच्या चित्राची आठवण झाली. राजघराण्यातल्या बाईसारखी दिसत होती. कुंकवाचीसुद्धा आडवी चिरी...... वा: !

“रायाजीसुद्धा फोटो हातात घेऊन बराच वेळ पाहात राहिले. ते आईलाच

बघत होते. तिला पाहता पाहता पुढचं काहीही विचारायचं ते विसरून गेले. "

नंतर नानांचा फोटो वर्तमानपत्रात छापून आला. परंतु त्यांचा शोध लागला नाही. त्याला पंधरा दिवस होऊन गेले. फोटो रायाजीकडेच होता. एके दिवशी आईने शिवाला तो फोटो मागून आणण्यास सांगितला. शिवा फोटो मागून आणण्यासाठी रायाजीच्या खोलीकडे गेला. खिडकीच्या उघड्या फटीतून त्याला पुढीलप्रमाणे दृश्य दिसले.

" रायाजी खाटेवर उघडे झोपले होते. उताणे पडले होते. लेंग्याच्या नाडीतून त्यांनी एक हात आत सारला होता, आणि दुसऱ्या हातात आई–नानांचा फोटो धरून ते एकटक पाहात होते. मी थोडा वेळ तसाच उभा राहिलो, तरीही रायाजी एकटक तसेच फोटोकडे बघत होते... "

नंतर शिवाची आई कुशाबापूच्या खानावळीत कामाला लागली. कुशाबापूनं आपल्या बायकोला माहेरी पाठविली ती पुन्हा आणलीच नाही. आणि खानावळीत आई मालकिणीसारखी वागू लागली. " मागच्या खोलीत ती बसायची. तिथं कुशा-बापूच्या ट्रंका होत्या, तिजोरी होती, कधी कधी रात्रीमागून रात्री तो खोलीवर येतच नसे..... सुरुवातीला ती कुशाबापू म्हणायाची. पुढं पुढं ती नाव टाळायला लागली. मालक म्हणायला लागली. आई नानांशी कधी धड बोलली नाही. नाना-प्रमाणेच त्यांच्या मांजरीचादेखील तिने दुस्वास केला. आणि आता या कुशाबापूला मालक म्हणते. हे काय आपल्या लक्षात येत नाही ?– मला तर जास्त संताप याव-याचा, विशेषतः कुशाबापूचा. दुसऱ्याच्या गरजेचा असा फायदा घ्यायचा म्हणजे काय ? ..... "

अशी ही 'स्वगत' मधील नाती आहेत. इथलं जीवन एका चाळीतलं आहे. शहरातलं (मुंबईतलं) आहे तरी पण शहरी नाही. हे जीवन असं आहे की त्याला नात्यागोत्याची ओढ नाही–बंधन नाही. असं असलं तरी इथलं जीवन बंधनरहित नाही; मुक्त नाही आणि विरक्त तर नाहीच नाही. या जीवनाला ओढ आहे ती भुकेची. पोटाच्या भुकेची तशीच वासनांच्या भुकेची. इथे शिवनाथला चौपाटीवर एक केळीवाली भेटते. ती शिवनाथला म्हणते,

'शेठ केळं खा !'–तिनं फण्यातलं केळ तोडलं तर–

मी म्हटलं, 'नको !'

तर ती म्हणाली, 'नको कसं ? आता तोडलं तर–'

मी केळ तसंच हाती धरून बसलो. आणा दिला.

ती म्हणाली 'आणखी दोन आणं द्या शेठ.'

'का ?'

हात लावा म्हणत तिनं छातीवरला पदर बाजूला केला. तिच्या चोळीला धड गाठीमुद्धा नव्हत्या. तिनं एका बाजूला चोळी वर केली. मी बघत राहिलो. तिथंच

तिचं मंगळसूत्र होतं. मी वेड्यासारखा बघतच राहिलो. चुकून तिचा नवरा इथ आला आणि त्यानं पाहिलं तर ? तो नानांसारखा संन्यास घेऊन पळ काढील का कुऱ्हाडीनं सगळ्यांची मुंडकी तोडील ? की त्याच्या संमतीनंच हे सारं चाललंय ? शक्य आहे. पैशासाठीच कोण कोण काय काय करील नेम नाही... मी दोन आणे दिले आणि हात फिरविला. कुशाबापूला आई ! मला केळीवाली !

" अंगावर नागीण सरकली. खूप बरं वाटलं. हाच स्पर्श हवा होता. अंगावर काटा पसरला. तसं बोलण्याऐवजी आडवं पडावसं वाटलं—"

' स्वगत 'मधील नातं हे असं. आणि मूक अशी. याहीपेक्षा निरनिराळ्या भुका आहेत. इथे प्रेताच्या उत्तरक्रियेसाठी घेतलेल्या पैशांत सामान खरेदी करण्यापूर्वीच दोशा आणि कांदाभजी खाल्ली जाते. आणि याच्या तोंडाचा कांद्याचा वास तिथल्या वास घेणाराला सहन होत नाही. त्याच्याही पोटात दुखतं. मार्तिकाचं सामान आणायचे पैसे आपणच या गोपूजीच्या आधी पटकावयाला हवे होते असं वाटणारेही आहेत.

' स्वगत 'मध्ये म्हाताऱ्यांची तर रांगच आहे. हे म्हातारे मोटारचे नंबर लावीत बसतात. वेळ जात नाही म्हणून त्यांना चाळा हवा आहे. त्यातही काही म्हातारे आवळे खातात पण त्यांना दूध प्यायला मिळत नाही. त्यांना जवानी परत आणायची असते. एका म्हाताऱ्याने दुसवटचाचे लग्न केलेले असते. मुलगी शोभेल अशी बायको त्याने घरात आणलेली असते. परंतु रसरशीत जवान स्त्रीला हा म्हातारा तृप्त करू शकत नाही. त्याचं काम त्याचा थोरला मुलगा करतो. सावत्र मुलगा. त्यामुळे म्हाताऱ्याच्या मनाचा भडका उडतो. ' सावत्र झाला म्हणून काय झालं. शेवटी मुलगा तो मुलगाच ना ?' असं पोटतिडकीने तो विचारतो.

## वास्तव जीवनाचे चित्रण

असे हे जीवनाचे एक वेगळेच स्वरूप दळवींच्या ' स्वगत 'मध्ये कलारूप ल्यायले आहे. असं हे भकास, लक्तरे लोंबणारे, कुत्र्यांसारखी ल्ह्या ऽऽऽ ल्ह्याऽऽऽ जीभ टाकून धावत सुटलेलं हे प्रखर वास्तव जीवन दळवींनी आपल्या कादंबरीसाठी निवडलेलं आहे. मानवी जीवनाच्या आदर्शत्वाच्या पताका इथे जवळदासही कुठे दिसत नाहीत. या साऱ्या वखवखलेल्या असंख्य माणसांच्या जत्रेत एकही सनातन प्रकृतीचा मनुष्य दिसत नाही. सहज जाता येता या लोकांना आडवा जात नाही. यांना अपशकुन करण्यासाठी, किंवा स्वतःला अपशकुन करून घेण्यासाठीही !

दळवी यांच्या ' स्वगत 'मधील ही एक लक्षात राहणारी गोष्ट आहे. इतकेच नव्हे तर ' स्वगत 'च्या यशाचं ते एक ठळक गमक आहे. असे हे नेहमीच्या वाऱ्या-उन्हापासून बचावलेले, मुद्दाम बाजूला नेलेले एक निखळ विश्व आहे. कादंबरीचा नायक शिवबा स्वतः एक अविवाहित तरुण आहे, तो कुरूप आहे, बुटका आहे, अशिक्षित आहे. त्याच्या जीवनाला कुठल्याही प्रतिष्ठित घराण्याची परंपरा नाही.

नीति-अनीतीची चौकट नाही. परंतु बऱ्या-वाइटाची त्याच्या मनात तडफड आहे. आशेची स्वप्नं फुलविण्याची त्याच्या मनाला हौस आहे. पण या स्वप्नांचे क्षितीज अमर्याद नाही. सहजपणे आपल्या मगदुरीच्या टप्प्यात येतील अशीच स्वप्नं तो पाहतो. उदाहरणार्थ बहिणीच्या नवऱ्याने उपभोगिलेली कालिंदी याला सांगून येते. हा तिला पसंत करतो आणि दुसऱ्याच दिवशी कालिंदी आत्महत्या करते. कारण तिच्या पोटात मेव्हण्याचा गर्भ वाढत असतो. तिच्या मृत्यूची शिवनाथला चुटपूट लागते. तो म्हणतो तिनं पाप केलं होतं तरी मी तिच्याशी लग्न केलं असतं. तिनं पोट दुसऱ्यापासून वाढविलेलं होतं तरी मी तिला पदरात घेतली असती !

परंतु त्याच्या या क्षमाशीलतेचं कारण रक्तातील संस्कृती नव्हे. ते तसलं रक्तच त्याला लाभलेलं नाही. त्याचं कारण अगदी साधं, सुटसुटीत आणि व्यवहारी आहे. त्याचं कारण असं आहे की कालिंदीच्या हातून पाप घडलेलं आहे तेव्हा केवळ रूपाचा दिमाख दाखवून तिला आपल्यावर हुकमत गाजविता येणार नाही. म्हणजे याची कुरूपता आणि तिचं पाप यात कुठेतरी तडजोड करण्याची 'स्वगत'च्या नायकाची इच्छा असते.

'स्वगत'मध्ये अक्षरशः पाचुंद्यांनी माणसे आहेत. प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व आहे, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या जीवनाच्या ठरलेल्या मर्यादा आहेत. त्या व्यक्तींच्या जीवनाच्या मर्यादांची जाणीव अर्धी कादंबरी वाचताच वाचकांना होते. त्यामुळे सकृतदर्शनी दळवींचं हे अपयश आहे असं वाटण्याचा संभव आहे. परंतु तेच खरं यश आहे असं म्हटलं पाहिजे. कारण आपल्या मर्यादांचं उल्लंघन करता न येणं हीच एक मानवी जीवनाची शोकांतिका आहे. दळवींनी आपल्या कादंबरीसाठी जे एक विश्व निवडलेले आहे त्या विश्वाच्या शोकान्तिकेचं दर्शन म्हणूनच प्रभावीपणे घडविण्यात त्यांना यश मिळालेलं आहे. श्री. ना. पेंडसे यांच्या लव्हाळीला जे यश वरील संदर्भात मिळवता आलेलं नव्हतं ते यश 'स्वगत'ने मिळविलेलं आहे. येथे दोन्ही कादंबऱ्यांची तुलना करून सरस-निरस ठरविण्याचा माझा हेतू नाही. परंतु लव्हाळीतील मानवी जीवनाला ज्या मर्यादा पडतात त्यांची अपरिहार्यता कलात्मक पातळीवर नेऊन दुःखांतिकेचं दर्शन घडविण्यात पेंडसे यांना यश मिळालेलं नाही. त्याचं कारण त्यांच्यातला कलावंत यासाठी अपुरा पडला हे नसून त्यांनी 'लव्हाळी'करिता जी शैली पत्करली ह आहे ! मानवी जीवनाच्या ज्या ज्या पैलूंचं ज्या वेगवेगळ्या पातळ्यांवरून दर्शन घडवावयाचे असते त्यासाठी निवेदनाची वेगवेगळी पद्धती स्वीकारावी लागते. दळवी यांनी निवेदनाची जी पद्धती 'स्वगत'साठी स्वीकारली आहे त्या पद्धतीची अपरिहार्यता इथे पटते. म्हणून हेच तिचे यश आहे असे म्हणावे लागते. त्यांच्या 'चक्र'पेक्षाही 'स्वगत' ही कलात्मक दृष्टीने देखील यशस्वी कलाकृती आहे हे निर्विवाद आहे. ○

[प्रकाशक : मॅजेस्टिक बुक स्टॉल, पृष्ठे : १९० किंमत : आठ रुपये.]

# व्हॉल्गा

वि. स. वाळिंबे

## १६

लेनिनच्या निधनाची बातमी सोळा तास गुप्त ठेवण्यात आली होती. २२ तारखेच्या सकाळपासून मॉस्कोत तशी कुजबूज सुरू झाली होती. परंतु ही बातमी खरी आहे की नाही यासंबंधी कोणालाच निश्चित माहिती नव्हती. सर्वसामान्य नागरिक या बातमीवर विश्वास ठेवायला तयार नव्हता. आणि त्याला कारणही तसेच होते. लेनिनची प्रकृती सुधारत असल्याच्या बातम्या वारंवार प्रसिद्ध होत होत्या. गोर्कीला जाऊन येणारे लोकही या बातम्यांना दुजोरा देत असत. लेनिनची भेट घेण्याची सहसा कोणालाच परवानगी मिळत नसे. तरीही गोर्कीला जाऊन येणारी व्यक्ती जणू काही लेनिनची आणि आपली भेट झाली अशा थाटात निर्वाळा देई की लेनिनला आता पुन्हा चालायला, बोलायला येऊ लागले असून तो अधून मधून शिकारीलाही जात असतो. येत्या मे महिन्यापर्यंत लेनिन चांगला बरा होऊन मॉस्कोला परतेल व राज्यकारभाराची जबाबदारी पुन्हा स्वीकारील असाच सर्वांचा समज होता आणि त्यामुळे साहजिकच लेनिनचे आकस्मिक निधन झाले आहे, या बातमीवर विश्वास ठेवणे कठीण जात होते. जो तो सरकारी निवेदनाची वाट पाहात होता.

सकाळी ११–५० वाजता सोव्हिएट काँग्रेसची बैठक सुरू झाली. अध्यक्ष कालिनिन याने सभागृहात प्रवेश केला तेव्हा त्याचा चेहरा कमालीचा गंभीर होता. सर्वजण उठून उभे राहिले. कालिनिन याच्या डोळ्यांतून आसवे वाहात होती. स्वतःला सावरत तो सांगू लागला, " आपल्या लाडक्या नेत्यासंबंधी– लेनिनसंबंधी– मला आपल्याला दुःखदायक बातमी सांगायची आहे. "

कालिनिन याचा गळा दाटून आला होता. तो आता काय सांगणार याचा सर्वांनाच अंदाज आला. सभागृहामध्ये चमत्कारिक शांतता पसरली. प्रेक्षकांच्या गॅलरी-

# जेव्हा लाल होते

**लेनिनला देव बनवले तरच आपले मनोगत सिद्धिला जाणार हे स्टॅलिनने अचूक ओळखले. अखेर देव न मानणाऱ्या राजवटीला आपला स्वतंत्र देव तयार करावा लागला.**

---

मध्ये हजर असलेल्या एका स्त्रीचा हुंदका साऱ्या सभागृहाला ऐकू आला. थरथरत्या आवाजात कालिनिन सांगत होता, "लेनिनला काल सायंकाळी पक्षाघाताचा आणखी एक झटका आला आणि काही मिनिटांच्या आतच..." कालिनिन याला पुढे बोलवत नव्हते. क्षणभर त्याने सभासदांकडे दृष्टिक्षेप टाकला. सर्वांच्याच माना खाली गेल्या होत्या, प्रत्येकाचे डोळे भरून आले होते. कालिनिन याने मोठ्या प्रयासाने आपले मघाचे वाक्य पूर्ण केले–"काही मिनिटांच्या आतच त्याचे निधन झाले."

यानंतर कालिनिनने लेनिनच्या मृत्युसंबंधीचे सरकारी पत्रक वाचून दाखविले. या पत्रकात म्हटले होते– 'गेल्या काही दिवसांपासून लेनिनची प्रकृती सुधारत होती. तो लवकरच संपूर्णपणे बरा होईल असा डॉक्टरांना विश्वास वाटत होता परंतु काल सायंकाळी एकाएकी त्याची प्रकृती बिघडली आणि त्याची शुद्ध हरपली ती कायमचीच.' पत्रकात शेवटी म्हटले होते– 'राज्यकारभाराची धुरा यापुढे आपल्याला या अकराव्या ऑल युनियन सोव्हिएट काँग्रेसला स्वीकारावयाची आहे.' या पत्रकावरून असे भासविण्यात आले होते की, सोव्हिएट काँग्रेस हीच आता सर्वसत्ताधारी झालेली आहे.

परंतु वस्तुस्थिती सर्वस्वी वेगळी होती. लेनिन अंथरुणाला खिळल्यापासून रशियाची सर्व सूत्रे स्टॅलिन, झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह या तिघांकडे आलेली होती. आणि या तिघांतही स्टॅलिन वरचढ ठरलेला होता.

सायंकाळी झिनोव्हेव्हने लेनिनला श्रद्धांजली वाहिली. तो म्हणाला, 'लेनिनच्या निधनाने कम्युनिस्ट इंटरनॅशनलचा संस्थापक, जागतिक साम्यवादी आंदोलनाचा नेता, रशियातील कामगारांच्या हुकूमशाहीचा प्रमुख नाहीसा झाला आहे. लेनिनचा वारसा सांभाळणे हेच आपले कर्तव्य आहे.'

लेनिनच्या निधनाने सारा रशिया हादरून गेला होता. क्रांतीनंतर निर्माण झालेल्या अनेक समस्यांतून तो वाट काढील असा प्रत्येकाला भरवसा वाटत होता. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लेनिन कोणाचीही पर्वा करीत नसे. १९१७ च्या नोव्हेंबरमधील बोल्शेव्हिक क्रांती त्याच्या एकट्याच्याच प्रेरणेमुळे घडून आली होती. या क्रांतीनंतर देशात यादवी युद्धाचा डोंब निर्माण झाला असतानाही लेनिनचा स्वतःवरचा विश्वास ढळला नव्हता. नव्या राजवटीवर एकामागाहून एक संकटे कोसळत होती. या संकटांवर मात कशी करायची याच एका विचाराने लेनिन व्यग्र असायचा. नव्या राजवटीची पहिली चार वर्षे जिकिरीची गेली. १९२१ च्या अखेरीपर्यंत लेनिनने आपल्या अंतर्गत शत्रूंचा पुरा पाडाव केला होता. यापुढे त्याला नव-रशियाच्या उभारणीचे कार्य हातीं घ्यायचे होते. गेली वीस-पंचवीस वर्षे डोक्यात वागविलेल्या विचारांना कृतिरूप द्यायचे होते आणि एवढ्यातच त्याला अर्धांगवायूसारख्या दुर्धर रोगाने गाठले. मृत्युशय्येवर खिळल्यानंतरही रशियातील नवजात कम्युनिस्ट राजवट स्थिर कशी होईल, या राजवटीमार्फत जागतिक क्रांतीला कशी चालना देता येईल या काळजीने लेनिनच्या जिवाची तगमग होत होती. या आजारातून तो उठेल असे डॉक्टर सांगत होते आणि त्यामुळे लेनिन मॉस्कोला केव्हा परत येतो याचीच सारेजण वाट पाहात होते. परंतु ती आशा आता खोटी ठरली होती.

रशियातील कम्युनिस्ट राजवटीचा आधार हरपला होता. क्रांतीनंतर जन्माला आलेली ही राजवट एवढा मोठा धक्का प्रथमच सहन करीत होती.

लेनिनचे निधन झाले त्या वेळी ट्रॉटस्की विश्रांतीसाठी सुखुमकडे चालला होता. तो टिफ्लिस स्टेशनवर उतरला तेव्हा त्याच्या हाती स्टॅलिनची तार पडली. या तारेत स्टॅलिनने एवढेच म्हटले होते–'लेनिनचे निधन झाले आहे.' ट्रॉटस्कीने ती तार वाचली आणि आपल्या पत्नीच्या हाती दिली. ट्रॉटस्की कोणाशी काहीही बोलला नाही. लेनिनच्या निधनामागे स्टॅलिनचा हात असावा, अशी त्याची खात्री असल्यामुळे आताच यासंबंधी बोलणे इष्ट नव्हे, असा त्याने विचार केला असावा. त्याने टिफ्लिसहून क्रेमलिनमध्ये टेलिफोन करून लेनिनची अंत्ययात्रा केव्हा निघणार आहे याची चौकशी केली.

क्रेमलिनमधून बोलणारी व्यक्ती त्याला सांगत होती, 'अंत्ययात्रा उद्या निघणार आहे, तोपर्यंत तुला इथे परतणे शक्य नाही. म्हणून तू पूर्वी ठरल्याप्रमाणे सुखुमला जावं आणि प्रकृती सुधारल्यानंतर इकडे परत यावं, हे चांगलं असं आम्हाला वाटतं.'

या वेळी ट्रॉटस्कीची विचारशक्ती लोपली असावी. क्रेमलिनमधून आलेली सूचना त्याने बिनतक्रार मान्य केली. मॉस्कोला परतण्याऐवजी तो सुखुमकडे जाणाऱ्या आगगाडीत बसला.

लेनिनच्या अंत्ययात्रेच्या वेळी आपण मॉस्कोत हजर नसलो तर आपला विनाश ठरलेलाच आहे, ही गोष्ट त्याला त्या वेळी उमगली नाही. स्टॅलिनविरुद्धच्या लढाईत ट्रॉटस्कीचा पहिला पराभव झाला तो येथेच. आणि या पराभवाला तो स्वतःच कारणीभूत ठरला. क्रेमलिनची वाट ट्रॉटस्कीला कधी सापडलीच नाही.

जानेवारी महिना असल्यामुळे मॉस्कोत कडाक्याची थंडी पसरली होती. बोचरे वारे आणि अविरत हिमवृष्टी यांमुळे शहरातील वाहतूक विस्कळित झालेली होती. सगळ्या वातावरणावर औदासीन्याची गर्द छटा पसरली होती. २३ जानेवारीच्या सकाळी लेनिनचा मृतदेह गोर्कीहून मॉस्को येथे आणण्यात आला. लोकांना त्याचे अंत्यदर्शन घेता यावे यासाठी शवपेटिकेच्या तीन बाजूंना लहानशा खिडक्या ठेवण्यात आल्या होत्या. मॉस्कोतील पॅव्हेलेटस्की स्टेशनापासून लाल चौकाजवळील हाऊस ऑफ ट्रेड युनियन्सच्या सभागृहापर्यंत लेनिनची अंत्ययात्रा काढण्यात आली तेव्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना कडाक्याची थंडी असतानाही हजारो शोकमग्न नागरिक आपल्या लाडक्या नेत्याच्या दर्शनासाठी दाटीवाटीने उभे होते. पायरस्त्याच्या कडेला सैनिक मानवंदनेसाठी लष्करी शिस्तीत उभे होते. काळी चौकट लावलेले लाल ध्वज ठिकठिकाणी उभारण्यात आले होते. लेनिनची शवपेटिका तोफगाड्यावर ठेवण्यात आली होती आणि हा गाडा ओढण्याची जबाबदारी पक्षकार्यकर्त्यांनी स्वीकारली होती. आपल्या नेत्याला आदरांजली वाहण्यासाठी गाडा ओढण्याची संधी मिळावी, यासाठी अनेकांची घडपड सुरू होती. स्टेशनपासून हाऊस ऑफ ट्रेड युनियन्सची इमारत पाच मैलांवर होती. हा सर्व रस्ता हिमवृष्टीने वेढून टाकला होता. तरीही लोकांची इतकी गर्दी होती की, अंत्ययात्रा हाऊस ऑफ ट्रेड युनियन्सच्या इमारतीपर्यंत पोचायला कित्येक तास लागले.

या इमारतीच्या हॉल ऑफ कॉलम्स या सभागृहात उभारण्यात आलेल्या चौथऱ्यावर शवपेटिका ठेवण्यात आली. या चौथऱ्यावर जो फलक लावण्यात आला होता, त्यावर लिहिले होते–' लेनिनचे निधन झाले असले तरी त्याचे कार्य अमर आहे.' काही वर्षांनी याच इमारतीत स्टॅलिनने लेनिनच्या बहुतेक सर्व सहकाऱ्यांवर निरनिराळ्या आरोपांखाली खटले भरून त्यांना देहान्ताची शिक्षा फर्मावली.

लेनिनच्या शवपेटिकेभोवती मंत्री आणि केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य पहाऱ्यासाठी उभे होते. दहा मिनिटांनी पहिले चार पहारेकरी विश्रांतीसाठी आत जात आणि त्यांच्या जागी नवे पहारेकरी येत. लेनिनचे शव अंत्यदर्शनासाठी चार दिवस ठेवण्यात येणार असल्यामुळे साहजिकच आळीपाळीने तेथे पहारा करण्याची व्यवस्था ठेवणे आवश्यक झाले होते. लेनिनचा चेहरा मेणासारखा पिवळट–पांढरा दिसत होता. मात्र त्यावर एकही सुरकुती नव्हती. त्याचे डोळे मिटलेले असल्यामुळे चेहऱ्यावर मृत्यूची भीषणता कोठेही दिसत नव्हती. तो नुकताच झोपी गेलेला असावा,

असा भास होत होता. या वेळी मॉस्कोतील तपमान शून्याखाली वीस अंशावर गेले असल्यामुळे हवेत कमालीचा गारठा आलेला होता. तरीही देशाच्या सर्व भागांतून हजारो कामगार आणि शेतकरी लेनिनच्या अंत्यदर्शनासाठी मॉस्कोत लोटले होते. लेनिनचे शव ज्या इमारतीत ठेवले होते, तिच्यासमोर लांब रांग लागली होती. रात्रीच्या वेळी थंडीपासून रक्षण व्हावे म्हणून रांगेत उभी असणारी माणसे शेकोटया पेटवीत होती. अनेकजण तर थंडीने बेशुद्ध पडले. दुपारच्या वेळी हवेत थोडीशी ऊब आली की, लोक उत्साहित होऊन क्रांतिगोते गाऊ लागत.

प्रारंभी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा असा विचार होता की, रात्रीच्या वेळी सभागृहाचे दरवाजे बंद करून घ्यावेत. परंतु लोकांची अमाप गर्दी पाहिल्यानंतर हा विचार रद्द करून लेनिनच्या अंत्यदर्शनासाठी चोवीस तास सभागृह खुले ठेवण्यात आले. लेनिनच्या अंत्यदर्शनासाठी आलेल्या असंख्य लोकांपैकी बऱ्याचजणांनी त्याला पूर्वी पाहिलेले नव्हते. त्यामुळे साहजिकच ते शवपेटिकेपाशी आल्यानंतर लेनिनच्या चेहऱ्याचे निरीक्षण करण्यासाठी तेथे बराच वेळ थांबत असत. ज्याच्यासंबंधी आता-पर्यंत इतके ऐकले होते, तो लेनिन दिसायला कसा होता, हे जाणून घ्यायला प्रत्येक-जण उत्सुक होता.

२५ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता लेनिनचे दफन होणार असल्याची बातमी सर्व वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली होती. परंतु आगगाड्या भरभरून लोक मॉस्कोस येत होते. एखाद्या यात्रेसारखे मॉस्को शहराला रूप प्राप्त झाले होते. आपल्याला लेनिनचे अंत्यदर्शन घेण्यास मिळालेच पाहिजे असा लोकांचा आग्रह होता. त्यामुळे लेनिनच्या दफनविधीचा बेत एक दिवसाने पुढे ढकलावा लागला. क्रुपस्काया शव-पेटिकेशेजारी बसून होती. एखाद्या पुतळ्यासारखी ती निश्चल बसलेली असायची. सर्वस्व गमावलेल्या स्त्रीच्या चेहऱ्यावर जो शून्यभाव दिसतो तशी दिसत होती. खरोखरच ती लेनिनच्या वादळी आयुष्याशी सर्वार्थाने समरस झालेली होती.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २९ जानेवारीला ऑल युनियन कॉंग्रेस ऑफ सोव्हिएटची बैठक भरून तीत लेनिनला श्रद्धांजली वाहण्यात आली. या बैठकीत कालिनिन, क्रुपस्काया, झिनोव्हेव्ह आणि स्टॅलिन यांची भाषणे झाली. क्रुपस्कायाने अगदी छोटेसेच भाषण केले. ती म्हणाली, ' व्लादिमिरच्या शवपेटिकेपाशी मी बसले अस-ताना मी त्याच्या जीवनाचाच विचार करीत होते. मला त्याचे जे जीवन समजले ते सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. पददलितांसाठी त्याचं अंतःकरण सदैव तुटत असे. ही गोष्ट त्याने स्वतः कधी सांगितली नाही. मीही आतापर्यंत व्लादिमिर-संबंधी बोलले नव्हते. पण आज आपलं अंतःकरण मोकळं करावं असं मला वाटतं. श्रमजीवी जनतेची पिळवणुकीपासून सुटका करण्यासाठी आपण काय केलं पाहिजे या एकाच विचारानं लेनिन सदैव व्यग्र असायचा. ही तळमळ त्यानं रशियन क्रांति-कारक आंदोलनापासून घेतली होती. पददलितांची मुक्तता करायची असेल तर

मार्क्सकडेंच वळले पाहिजे हे त्याला पटल. मार्क्सच्या लिखाणावर त्याचे केवळ पुस्तकी प्रेम नव्हते. त्याला अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नाची उत्तरं मार्क्सच्या विवेचनात सापडली म्हणून तो मार्क्सकडे वळला. व्लादिमिर कामगारांची गाऱ्हाणी लक्षपूर्वक ऐकायचा. त्या वेळी तो कामगारांना मार्क्सवाद समजावून सांगत असे. त्या वेळी याची तळमळ इतरांना सहज प्रतीत होत असे. आज आपण शेतकरी आणि कामगार यांच्या एकजुटीची भाषा बोलत आहोत. परंतु ही एकजूट इतिहासानेच निर्माण केली आहे हे आपण ओळखलं पाहिजे. रशियन कामगार हा जसा एका बाजूला कामगार आहे तसाच तो शेतकरी आहे. पेट्रोग्राडमधील कामगारांमध्ये काम करायला लागल्यानंतर व्लादिमिरला ही गोष्ट तीव्रतेने पटली आणि तेव्हापासून तो शेतकरी आणि कामगार यांच्या एकजुटीवर भर देऊ लागला मात्र पददलितांच्या मुक्ततेसाठी जी क्रांती करावयाची आहे त्या क्रांतीत कामगारवर्गच आघाडीवर राहू शकेल हेही त्यानं ओळखलं होतं. व्लादिमिरचं सारं सामर्थ्य कामगारवर्गावरील





बृहन्मुंबईकरिता वितरक
**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २
बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक
**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

त्याच्या विश्वासात सामावलं होतं. तो विजयी होऊ शकला तोही या विश्वासाच्या बळावरच.'

क्रपस्कायानंतर कालिनिन आणि झिनोव्हेव्ह यांची भाषणे झाली. त्या भाषणात कोणताही बोल्शेव्हिक बोलतो तसली ठराविक पोपटपंची होती. ' पददलित जनतेच्या एकजुटीचा विजय असो ' या व्यतिरिक्त त्या भाषणात कोणताही मुद्दा नव्हता. त्यामानाने स्टॅलिन चतुर होता. सारा देश लेनिनच्या निधनामुळे भारावून गेला आहे हे पाहून त्याने लेनिनचे गुणगान करून या थोर पुरुषाचा वारसा चालविण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत असे आश्वासन दिले. लोकांची सहानुभूती मिळविण्यासाठी त्याने हेतुतः स्वतःकडे दुय्यम भूमिका घेतली होती. लेनिन हा किती उच्च योग्यतेचा महापुरुष होता हे तो घोळून घोळून सांगत होता. साहजिकच लेनिनवादाचा खरा भाष्यकार स्टॅलिनच आहे असा लोकांचा समज झाल्यास नवल नव्हते. गेली दोन वर्षे स्टॅलिनने लेनिनविरुद्ध शत्रुत्व पत्करले होते. पण या भाषणाला त्याने आपल्या शत्रुत्वाचा किंचितही वास येणार नाही अशी दक्षता घेतली होती.

लेनिनला देव बनविले तरच आपले मनोगत सिद्धीला जाणार आहे हे स्टॅलिनने अचूक ओळखले होते.

देव न मानणाऱ्या राजवटीलाही आपला स्वतंत्र देव निर्माण करावा लागला. सेंट पीटरच्या नावाशी निगडित असलेल्या पेट्रोग्राडचे लेनिनग्राड असे नामान्तर करण्यात आले. २१ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय दुखवटयाचा दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय करण्यात आला. सर्व प्रमुख शहरांतून लेनिनचे पुतळे उभारण्यात आले. त्याने लिहिलेल्या प्रत्येक वाक्याला ब्रह्मवाक्याचे स्वरूप प्राप्त झाले. लेनिनच्या मृत देहाचे दफन करण्याऐवजी तो काचपेटिकेत ठेवून लेनिनचे देऊळ बांधण्याचे ठरले. लेनिनच्या जीवनाइतकाच त्याचा मृत्यूही प्रभावशाली ठरला. आयुष्यभर त्याने ज्या नटण्यामिरवण्याचा तिटकारा केला होता, तो मृत्यूनंतर त्याच्या नशिबी आला. लेनिनसारख्या मूर्तिभंजकावर मृत्यूनंतर मूर्तीचे सोपस्कार करून घेण्याची पाळी आली.

झारशाहीतही जेवढी विभूतिपूजा नव्हती तेवढी ती आता कम्युनिस्ट राजवटीने आत्मसात केली होती.

लेनिनला देवत्व प्राप्त करून देणाऱ्या या कारवाईविरुद्ध सोव्हिएट-परिषदेत एकटया क्रपस्कायाशिवाय कोणीही विरोधी आवाज काढला नाही. तिला मात्र या सगळ्या प्रकाराची उबग आली होती. परंतु आता तिच्या विरोधाची दखल घेण्याची कोणालाच गरज वाटत नव्हती. लेनिनच्या मृत्यूनंतर ' प्रावदा 'मध्ये लिहिलेल्या लेखात क्रपस्काया आपल्या देशबांधवांना उद्देशून विनंती करते-' माझी

तुम्हाला हात जोडून अशी प्रार्थना आहे की व्लादिमिरबद्दल तुम्हांला जो आदर वाटतो त्याचे प्रदर्शन होता कामा नये. त्याची स्मारके उभारू नका. मोठ्या इमारतींना आणि रस्त्यांना त्याची नावे देऊ नका. कारण या बाह्य उपचारांना व्लादिमिरने आपल्या आयुष्यात कधीच स्थान दिलेले नव्हते. कोणी त्याचा सन्मान केला तर त्याला तो ओझ्यासारखा वाटायचा. अद्यापही आपल्या देशात किती दारिद्र्य आहे ध्यानात घ्या. तुम्हाला तर खरोखरच व्लादिमिरचे उचित स्मारक करायचे असले तर शाळा बांधा, ग्रंथालये उभारा, घरे, दवाखाने व रुग्णालये यांची पायाभरणी करा आणि मुख्य म्हणजे त्याने जी तत्त्वे प्रतिपादन केली ती आचरणात आणण्याचा प्रयत्न करा.'

परंतु क्रुपस्कायाच्या या उपदेशाकडे कोणीही लक्ष दिले नाही. स्टॅलिनला आणि त्याच्या सहकाऱ्यांना लेनिन आणि त्याची शिकवण नको होती. त्यांना लेनिनचे नाव हवे होते, लेनिनची पुण्याई हवी होती आणि ही पुण्याई आपल्या पाठीशी उभी राहावी यासाठी त्यांनी लेनिनच्या स्मृतीवर देवत्वाचा शेंदूर फासण्याचा सोईस्कर उपक्रम आरंभिला होता. पेट्रोग्राडचे नाव बदलता कामा नये, लेनिनचे शव काचपेटिकेत बंद करून ते दर्शनासाठी ठेवण्याचा विचार अमलात येता कामा नये, लाल चौकात लेनिनचे स्मारक उभारले जाता कामा नये यासाठी क्रुपस्कायाने खूप विरोध केला. तिने आपली सारी शक्ती पणाला लावली होती. तिचा हा उपद्व्याप स्टॅलिनला मान्य होणे शक्यच नव्हते. कम्युनिस्ट राजवटीच्या दृष्टीने क्रुपस्काया आता निरुपयोगी ठरली होती.

२८ जानेवारीपासून लेनिनला मानवंदना देण्याचा कार्यक्रम पुन्हा सुरू झाला. पहिल्याप्रथम स्टॅलिन, कालिनिन, झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांनी मानवंदना दिली. दहा मिनिटांनंतर मानवंदनेसाठी दुसरी तुकडी आली. तिच्यात बुखारिन, रिकोव्ह, मोलोटोव्ह आणि टोमस्की या दुसऱ्या क्रमांकाच्या मानकऱ्यांचा समावेश होता. त्यानंतर झेर्झिन्स्की, चिचेरीन, पेट्रोव्हस्की आणि सोकोल्निकोव्ह यांनी मानवंदना दिली. शेवटी कुइंबिशेव, ओर्दोनिकिद, पिआटाकोव्ह आणि येनुकिद यांनी हजेरी दिली. लेनिनच्या निधनानंतर रशियाची सत्ता कोणाच्या हाती गेली आहे हे यावरून स्पष्ट होत होते. मानवंदनेचा हा कार्यक्रम तासभर चालू होता. त्यानंतर लेनिनचे शव लाल चौकात आणण्यात आले. लेनिनच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहणारा कार्यक्रम तेथे जवळजवळ दिवसभर चालू होता. कारखान्यातील भोंगे वाजत होते. जहाजांवरील कर्णे गर्जत होते. तोफांचे आवाज आसमंत दणाणून सोडत होते. लेनिनच्या जयजयकाराने लोकांचे कान बधिर करून टाकण्याचा हा एक नवाच डाव खेळला जात होता. दुपारी चार वाजता, स्टॅलिन कामेनेव्ह, झिनोव्हेव्ह, मोलोटोव्ह, बुखारिन, टोमस्की, झेर्झिन्स्की आणि रुड्झुताक यांनी लेनिनची शवपेटिका लाल चौकातून

उचलली आणि क्रेमलिनच्या भिंतीलगत बांधण्यात आलेल्या तळघरात नेऊन ठेवली. थोड्या वेळाने हे सारेजण तळघरातून बाहेर आले आणि मोटारीतून त्यांनी क्रेमलिनकडे प्रयाण केले. तळघराच्या तोंडांशी संगीनधारी पोलिसांचा पहारा बसविण्यात आला.

लेनिन तूर्त तरी लोकांच्या नजरेआड गेला होता.

लाल चौकामध्ये लेनिनचे उचित स्मारक करावे एवढेच सोव्हिएट कॉंग्रेसमध्ये ठरले होते. हे स्मारक कशा स्वरूपाचे असावे यासंबंधी त्यावेळी विचार झाला नव्हता. या कामी अनेक चित्रकारांचा व शिल्पकारांचा सल्ला घेण्यात येत होता. प्रारंभी एका लाकडी भुयारातच लेनिनची शवपेटिका ठेवण्यात आली होती. यानंतर त्याच जागी एक झोपडी उभारण्यात आली व तेथे ही शवपेटिका ठेवण्यात आली. लेनिनचे शव आहे त्याच स्वरूपात टिकविण्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे यासंबंधी डॉक्टरांचा विचारविनिमय सुरू होता. प्रारंभी डॉक्टरांचे प्रयत्न अयशस्वी ठरत नव्हते. परंतु १९२६ मध्ये डॉक्टरांना, लेनिनचे शव आहे त्याच स्थितीत ठेवण्याच्या कार्यात यश प्राप्त झाले. यासाठी त्यांनी कोणती पद्धती वापरली याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली. मध्यंतरीच्या काळात अशीही अफवा पसरली होती की लेनिनच्या शवाचे दहन करण्यात आले असून शवपेटिकेत लेनिनची मेणाची मूर्ती ठेवण्यात आली आहे. शेवटी शवपेटिकेत ठेवलेला लेनिनचा मृत देह खरा आहे की नाही यासंबंधीची लोकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी चौकशीचे काम एका जर्मन डॉक्टरकडे सोपविण्यात आले. या डॉक्टराने लेनिनचा एक हातही वर उचलून पाहिला आणि ही मेणाची प्रतिकृती नसून खरोखरच तो मानवी मृत देह आहे याबद्दल त्याची खात्री पटली. त्याने आपल्या अहवालात तसे नमूद केल्यानंतर लेनिनच्या मृत देहासंबंधीच्या सच्चेपणाबद्दल शंका घेणाऱ्या अफवा बंद पडल्या.

लेनिनचे शव आहे त्याच स्वरूपात ठेवण्यात रशियन डॉक्टरांना यश मिळाल्यानंतर लाल चौकात स्मारकासाठी पक्की इमारत बांधण्यात आली. हे काम १९३० मध्ये पूर्ण झाले. येथे लेनिनचे शव काचेच्या पेटीत ठेवण्यात आले असून त्यावर नारिंगी प्रकाशाचे झोत सोडण्यात आले आहेत. प्रवेशद्वारापासून तीस पायऱ्या खाली उतरून गेल्यानंतर ही शवपेटिका दृष्टीस पडते. लेनिनने बंद गळ्याचे खाकी जॉकीट परिधान केले असून डावा हात आपल्या छातीवर ठेवलेला आहे. छातीपासून खालच्या भागावर पांघरूण ठेवण्यात आले आहे. लेनिनचे निधन होऊन आता चाळीसहून अधिक वर्षे लोटली आहेत तरीही त्याच्या मृत देहाकडे पाहताना तो नुकताच झोपी गेला असावा असा भास होतो. प्राचीन काळी इजिप्शियन लोक आपल्या राजांचे मृतदेह सांभाळून ठेवत असत. अलीकडच्या काळात या प्रथेचा अवलंब केल्याचे लेनिनचे स्मारक हे पहिलेच उदाहरण आहे. आणि त्यामुळेच मॉस्कोला

येणारा प्रत्येक देशी-परदेशी प्रवासी लाल चौकात येऊन लेनिनचे हे जगावेगळे स्मारक पाहण्यासाठी उत्सुक झालेला असतो. साम्यवादी राष्ट्रांच्या वा व्यक्तींच्या दृष्टीने तर या स्मारकाला एका पवित्र यात्रेचे स्वरूप आलेले आहे.

दुसरे महायुद्ध सुरू झाले त्या वेळी लेनिनचा मृत देह जर्मनांच्या हाती पडू नये म्हणून तो मॉस्कोतून हलविण्यात आला होता. युद्धसमाप्तीनंतर १९४५ मध्ये त्याची पुनर्प्रतिष्ठा करण्यात आली. १९५३ मध्ये स्टॅलिनचे निधन झाल्यानंतर त्याचा मृतदेहही लेनिनच्या शेजारी त्याच पद्धतीने ठेवण्यात आला होता. परंतु ख्रुश्चेव्हची राजवट सुरू झाल्यानंतर स्टॅलिनच्या निंदानालस्तीला उधाण आले आणि परिणामी १९६२ मध्ये स्टॅलिनला तेथून हलविण्यात आले आणि या स्मारकाच्या मागील बाजूला त्याचे दफन करण्यात आले.

तेव्हापासून लाल चौकातील त्या काळसर तांबड्या रंगाच्या छोटेखानी वास्तूमध्ये लेनिन एकटाच चिरनिद्रा घेत पहुडला आहे.

लेनिनने आपल्या 'दि स्टेट अँड रेव्होल्युशन' या ग्रंथात एके ठिकाणी म्हटले आहे – 'क्रांतिकारक जिवंत असताना सत्ताधारी त्याचा अतोनात छळ करीत असतात, त्याची पद्धतशीर बदनामी करण्याच्या कारवाया चालू असतात. परंतु हा क्रांतिकारक मरण पावल्यानंतर मात्र तो ज्या पददलित जनतेच्या सुखासाठी धडपडत असतो त्या जनतेला समाधान लाभावे म्हणून चतुर सत्ताधारी या क्रांतिकारकाचे निरुपद्रवी स्मारक उभारतात. त्या क्रांतिकारकाच्या शिकवणुकीचा खरा अर्थ लोकांच्या स्मृतीतून पुसला जावा यासाठीच ही दिखाऊ स्मारके उभारलेली असतात.'

मृत्युनंतर आपल्या नशिबीही हेच येईल याची शासनयंत्रणा आणि क्रांती यासंबंधीचे आपले विचार मांडताना लेनिनला मुळीच कल्पना नव्हती.

१९१७ च्या नोव्हेंबरमध्ये क्रांती झाल्यापासून १९२४ जानेवारीमध्ये निधन होईपर्यंत लेनिन सदोदित जागतिक क्रांतीचे स्वप्न आपल्या डोळ्यांसमोर रंगवीत होता.

त्याचे वारसदार त्याच्या या स्वप्नापासून केव्हाच दूर गेले होते.

(क्रमशः)

# भिंतीच्या तुंबड्या

। सुधाकर राजे ।

## टोपी फिरविण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण

राजकारण कसे करावे हे शिकविणारी एक शाळा म्हणे पंजाबात काढण्यात येणार आहे. घ्या ! मला आपले वाटत होते की कवी, प्रेमवीर आणि वेडा यांच्या-बरोबर राजकारणी पुरुषही जन्मावा लागतो. पण हल्ली कवींचे कारखाने निघाले आहेत, तेव्हा राजकारण्यांच्या शाळा काढण्याची कल्पना निघाली यात नवल नाही. आता शाळा म्हटली की अभ्यासक्रम आलाच. मला वाटते प्रस्तुत शाळेतल्या अभ्यास-क्रमाची सुरवात राजकीय मानसशास्त्राने करावी लागेल. या शास्त्रावरील क्रमिक पुस्तकात कमीत कमी पुढील धडे द्यावे लागतील : १. आपल्या मूळच्या पक्षाशी कमीत कमी आठवडाभर तरी एकनिष्ठ राहण्याइतका मानसिक खंबीरपणा अंगी कसा दाखवावा. २. दुसऱ्या एखाद्या पक्षाने आपल्याला विकत घेतल्यावर तिसऱ्या पक्षाने अधिक मोठी किंमत देईपर्यंत पक्ष क्रमांक दोनशी पूर्णपणे प्रामाणिक कसे राहावे. ३. 'स्वतंत्र' मताचे असल्यास आपल्या स्वातंत्र्याचा सर्वांत अधिक किफा-यतशीर सौदा कसा करावा. ४. विनोबांचा हृदयपालट आणि राजकारणातला पक्ष-पालट यांचा तौलनिक अभ्यास. या मानसशास्त्राचाच एक भाग म्हणजे विस्मरण-शक्ती वाढविण्याचेही शास्त्रशुद्ध शिक्षण द्यावे लागेल. कारण निवडणुकांच्या फडात दिलेली भरघोस आश्वासने निवडून आल्यावर विसरण्याची खबरदारी घेत नाही तो राजकारणात कधीच पास होऊ शकणार नाही.

या मानसशास्त्राच्या जोडीला इतिहास, भूगोल, अर्थकारण इत्यादी विषय शिकावे लागतील. इतिहासात "औरंगजेब हा आमच्या मते आधी हिंदी होता, मग मुसल-मान होता." हे मागे एका मंत्र्याने सांगितलेले अजब सत्य शिकावे लागेल. भूगोलात जगाच्या पाठीवर हिंदुस्थानाला भीक न घालणारा एक तरी देश उरला आहे का याचा बारकाईने शोध करावा लागेल आणि अर्थशास्त्रात किती पंचवार्षिक योजना पुऱ्या झाल्या म्हणजे देशाचे नीट वाटोळे होईल हे ओळखायला शिकावे लागेल. शिवाय या सर्व बौद्धिक शिक्षणाच्या जोडीला शारीरिक शिक्षणही हवे. कारण

निवडणुकीत उभे राहायचे अन् आपटी खायची म्हणजे माणूस टणक हवा. शेवटी प्रश्न एकच, अन् तो म्हणजे या शाळेतून ट्रेनिंग होऊन बाहेर पडलेल्या मंडळींना कुठला पक्ष नोकरीवर घ्यायला तयार आहे?

## देवाचा सरकारी धावा

पंजाबात निघालेली आणखी एक अफलातुन कल्पना म्हणजे बीटल्स-गुरू महर्षी महेश योगी यांच्या आधिभौतिक तत्त्वचिंतनाचा सरकारी नोकर-वर्गात प्रसार करायचे तेथल्या सरकारने ठरविले आहे. म्हणजे आता पंजाब सरकारचा कारकून पुढ्यातल्या फाइलीवर मार्जिनल नोटिंग करताना सेक्शन ऑफिसर आणि परमेश्वर या दोघांचे एकाच दमात नाव घेऊन सही करणार. देवाचा हा सरकारी धावा सफल झाला तर या तत्त्वचिंतक कारकुनांना प्रमोशनबरोबरच सरकारी सद्‌गतीही मिळण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे. आता फक्त एकच सोय हवी, व ती म्हणजे अधिकाऱ्यांना व कारकुनांना स्केलप्रमाणे मृगाजिने व व्याघ्राजिने वाटण्यात यावीत.

## वेद विरुद्ध इन्हेलर

परवा पंडित सातवळेकर दिल्लीला आले होते तेव्हा म्हणाले माणूस वेदात लिहिल्याप्रमाणे वागला तर त्याचे आयुष्य तर वाढेलच पण त्याला सर्दीदेखील व्हायची नाही. कमाल आहे बुवा या जुन्या मंडळींची. सर्दीवर उपाय म्हणून खिशात सुबकसा इन्हेलर ठेवायच्या एवजी वेदाची पोथी बाळगली तर आमची पोझिशनही काय राहील? शिवाय सर्दीवर वेद, खोकल्यावर गीता, हिवतापावर उपनिषदे अशी औषधे ठरली तर बिचाऱ्या यस्-फयस् मंडळींची काय अवस्था होईल? अन् सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला साधी सर्दी देखील होत नाही असे कबूल करणे हल्ली किती नामुष्कीचे आहे याची या जुन्या मंडळींना कल्पना तरी आहे का? उलट हल्ली पडसे झाले तरी माणूस "मला जरा 'लॅरिंजायटिस'चा त्रास आहे." असे बढाईपूर्वक सांगतो. एखाद्या बड्या अधिकाऱ्याला ब्लड-प्रेशर नसले तर त्याचा बडेपणा पोकळ आहे असे समजले जाते. तेव्हा वेद वाचून माणूस निरोगी झाला तरी बडा होणार नाही. मग काय उपयोग? त्यापेक्षा डेल कार्नेजीचे "हाऊ टु विन् फ्रेंड्स् अँड इन्फ्लुएन्स पीपल" वाचलेलेच बरे.

○



## सुधीर दामले

बेशिस्त, कंटाळवाणे आणि नीरस अशा तीनच शब्दांनी ज्याचे अचूक वर्णन करता येईल असे तिसरे मराठी चित्रपट संमेलन नुकतेच पुण्यात उरकले गेले. संमेलन म्हटले म्हणजे केवढी धावपळ, पळापळ, धामधूम असते ? इथे तसे काहीही नव्हते, ना कसला उत्साह, ना आनंद. सारे काही रुक्षपणे पार पडले. चित्रपट व्यवसायिकांचे एखादे संमेलन पुण्यात भरत आहे याची वार्ताच जणू पुणेकरांना नसावी आणि ज्यांचे हे संमेलन त्यांचे काय ? त्यांनाही फारशी कुणाला यात आस्था नव्हती. एकंदरीत इथून तिथून कशी मरगळच दिसून आली. कसेबसे दोन दिवस एकदाचे पार पडले इतकेच !

अशी मरगळ नव्हती, असा निरुत्साह नव्हता, क्षणाचीही उसंत नव्हती ती फक्त एकाच व्यक्तीला – समेलनाचे चिटणीस चारुदत्त सरपोतदार यांना !! स्वत:च्या घरचे मंगल कार्य असावे अशा आत्मीयतेने, संमेलनाच्या साऱ्या आघाड्या ते शर्थीने झुंजवीत होते. एक-दोनच नाहीत तर शंभर गोष्टींकडे एकटे चारुदत्त पाहत होते. त्यांचा उत्साह, त्यांची तळमळ पाहून मनात आले, यांचा आणि चित्रपटसृष्टीचा तसा काय संबंध ? एक-दोन चित्रांच्या निर्मितीत हातभार लावला असेल तेवढाच प्रत्यक्ष संबंध. त्या पलीकडे काय ? काही नाही. ना नट, ना दिग्दर्शक, ना लेखक किंवा कुणी तंत्रज्ञ !! तरीही हे कष्ट ते का करत होते ? एकाच कारणासाठी – चारुदत्त कलावंतांचे एक सच्चे स्नेही आहेत. याच स्नेहभावाला जागून, केवळ मैत्रीखातर चारुदत्त या संमेलनाची धुरा वाहण्यास पुढे सरसावले. पण चित्रपटवाले तरी कसे बिलंदर पाहा. " चारु करतोय ना, मग करू द्यात तर त्याला !"

अशी साऱ्यांची वृत्ती, आणि याच काम अंगाबाहेर टाकण्याच्या स्वभावामुळे एकही चित्रपट–व्यावसायिक चारुदत्तांना मदत करायला पुढे सरसावला नाही. आणि चारुदत्तही कुणाच्या मदतीवर अवलंबून राहिले नाहीत.

चारुदत्तांची मेहनत वाखाणीत होती, अभिनंदनीय होती हे जरी खरे असले तरी संमेलने हे कुणा एकट्यादुकट्याच्या मेहनतीने, किंवा श्रद्धेने पार पडत नसतात. सारे लोक स्वयस्फूर्ती, नि:स्वार्थीपणाने अंगमेहनत करायला एकत्र यावे लागतात. तसे न घडेल तर संमेलनाचे तीन तेरा वाजतात. त्यात बेबंदपणा–भोंगळपणा येतो.

# ३

# एका सन्मित्राची ससेहोलपट करणारे चित्रपट संमेलन

या तिसऱ्या चित्रपट संमेलनाचे अगदी असेच झाले. यापूर्वीच्या दोनही संमेलनांची जी रड झाली, त्यांवर जी टीका झाली तशाच टीकेला हे संमेलनही पात्र ठरले.

सर्वांत मोठा आक्षेप म्हणजे कलावंतांची, तंत्रज्ञांची अनुपस्थिती ! ! ज्यांच्यासाठी हा सारा खटाटोप करायचा तेच बहुसंख्य लोक याला हजर नसावेत ही केवढी खेदाची गोष्ट ! ! काही कलावंत नेमके करमणुकीच्या कार्यक्रमालाच तेवढे स्टेजवर दिसले पण म्हणजे काही ते संमेलनाला उपस्थित होते असे नाही. मग दोन दिवस झालेल्या चर्चा, परिसंवाद, भाषणे होती कुणासाठी ? बघ्या प्रेक्षकांसाठी ? पण ते तरी बापडे असे कुठे मोठ्या संख्येने या चर्चात्मक कार्यक्रमांना उपस्थित होते ? जाऊ द्या झालं ! संमेलन अयशस्वी झाले यात मुळीच संदेह नाही. आणि तेही केवळ कलावंतांच्या, तंत्रज्ञांच्या अनुपस्थितीमुळे ! ! ही गोष्टही तितकीच सत्य ! !

संमेलनाला जमलेले प्रतिनिधी किती ? फार तर दोनशे किंवा अडीचशे ! ! बरं या दोनशेमध्ये मातब्बर मोजण्याइतकेच ! मराठी चित्रपटसृष्टीतील सर्व वडीवडी कुळं या संमेलनात एकदाही दिसली नाहीत. वास्तविक त्या साऱ्यांचा आणि मराठी चित्रसृष्टीचा संबंध कसा आहे हे मुद्दाम सांगायलाच पाहिजे असे नाही. यातील बऱ्याचशा लोकांचे संसार आज मराठी चित्रपट–निर्मितीवर अवलंबून आहेत; असे असूनही ते लोक इकडे फिरकलेदेखील नाहीत, याचीच चीड येते ! असे का व्हावे ? जगात त्यांना अशी काय मोठी महत्त्वाची कामे होती म्हणून संमेलनाला आले नाहीत ? काहींना म्हणे नाटके होती ! पण संमेलनाच्या तारखा २–२ महिने अगोदर जाहीर होऊनही त्यांना नाटके सोडता आली नाहीत ? आणि तीही किती फक्त २ दिवस ! पण हे संमेलन आपले आहे ही जाणच कुणाला नव्हती. काही लोकांचा या संमेलनावर म्हणे बहिष्कार ! म्हणजे कमाल झाली, जन्माला येऊन ज्याने अजून पुरते डोळे उघडूनही जगाकडे पाहिले नाही अशा बालकाला तुम्ही निष्क्रिय म्हणून त्याची चेष्टा करता याला काय म्हणावे, हे तर अवघे तिसरे संमेलन. अशी कुठे ५०–६० संमेलने झाली म्हणून ह्या संमेलनांनी काहीही साधत नाही असे त्यांनी मानावे ? पाच–दहा संमेलने तरी सर्वांच्या उपस्थितीत प्रथम पार पडू द्यात. सगळ्यांना निकोप मनानं एकत्र येऊ तर द्या,

११ मे १९६८

मग बहिष्काराच्या वगैरे गोष्टी बोला ! पण छे, यांचा वेगळेपणा अशा बहिष्कारा-खेरीज कसा व्यक्त होणार ? केवळ संमेलन ही भावना ठेवून दोन दिवस हसून खेळून घालविण्यासाठीसुद्धा हे लोक एकत्र येऊ शकत नाहीत, त्यांची तशी इच्छाच नसते. अशांनी बाहेर सहकारांच्या गप्पा तरी मारू नयेत.

आमंत्रण नाही म्हणून काहीजण आले नाहीत म्हणे !

आज या सृष्टीत काम करणाऱ्यांना वेगळ्या आमंत्रणाची जरुरी वाटावीच का ?

आमंत्रणाचा आग्रह धरणे योग्य ठरणार होते ते, हा व्यवसाय एककाळ गाज-विलेल्या लोकांनी ! केशवराव दाते, आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, के. नारायण काळे, पु. ल. देशपांडे अशा काही मातब्बरांनी ! पण त्यांनी संमेलनात यावे, काही मार्गदर्शन करावे असे कुणालाच का सुचू नये ? का या लोकांचे ऋण नवे लोक मानायला तयार नाहीत ? वस्तुस्थिती अशी की यांपैकी कुणाला खास बोलावणेच नव्हते. संमेलनसंयोजकांची ही फार मोठी चूक !!

## भालजींचे परखड भाषण

आता विचार करायचा दोन दिवस प्रत्यक्ष काय घडले याचा !! दोन दिवसात स्मरणीय कार्यक्रम झाले फक्त दोन. एक अध्यक्ष श्री. भालजी पेंढारकर यांनी पर-खड शब्दांत तळमळीने केलेले भाषण, आणि करमणुकीच्या कार्यक्रमातले महाराष्ट्र दर्शन !! बस्स याखेरीज बाकी साऱ्या गोष्टी कंटाळवाण्या, उद्विग्नता निर्माण करणाऱ्या निर्जीव वाटल्या. याचे कारण संमेलनाच्या प्रथम दिवशीच एक विलक्षण चीड आणणारा प्रकार घडला. सकाळी ७॥ वाजता गणेशपूजन होते. ते तब्बल एक तास उशिरा सुरू झाले. त्यानंतर होती कार्यकारिणीची निवड. निवड जाहीर करण्याचा कार्यक्रम ! पण अपरिहार्य कारणामुळे ही निवडणूक होऊ शकली नाही असे जाहीर झाले. बऱ्याचजणांनी सुस्कारा टाकला कारण प्रत्येकाचे डोळे आणि कान पुढील एका महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी आसुसले होते. ग. दि. माडगूळकर 'जय धुंडिराज' हे नवे काव्य आणि ज्ञानेश्वरीच्या ओव्या वाचून दाखविणार होते ! त्यामुळे लोकांना खात्री होती काव्यवाचन तरी निश्चित होणार ! पण निवडणूक लांबल्याचे जाहीर झाले आणि स्वागताध्यक्ष दत्ता धर्माधिकारी एकदम उठून माईकपुढे गेले " सर्व कार्यक्रम संपलेला आहे आता उठायला हरकत नाही !!' असे सांगून ते मोकळे झाले. जय धुंडिराजचे वाचन का रद्द झाले ? हे कोडेच होते' कुणीतरी नंतर म्हणाले, "अण्णाजवळ गीताची प्रत नव्हती !" हरकत नाही अण्णांना आणखी काही ऐकवायची विनंती करायची, त्यांच्यासारख्या सिद्धहस्त कवीने उत्स्फूर्त असे बरेच काही ऐकविले असते. पण खुद्द स्वागताध्यक्षांनीच कार्यक्रम संपल्याचे जाहीर केलेले ! बरं माडगूळकरांचे गीतवाचन नाही तर संयोजकांना दुसरा काही कार्यक्रम सुचणे अशक्य नव्हते. पण तेही जमले नाही.

नंतरचा संमेलनाचा उद्घाटन समारंभ ? त्यात ना कसली शान, ना उत्साह, ना

गर्दीदेखील ! ! जेमतेम ४००।५०० लोक समारंभाला हजर होते. भालजी पेंढारकरांसारखा दमदार, फर्डा वक्ता असूनही श्रोत्यांनी येऊ नये याचे दुःख वाटते. पण हा दोष सर्वस्वी पुणेकरांचा ! ! त्याला संयोजक काय करणार ? असो ! ! उद्‌घाटनाच्या समारंभास केशवराव धायबरांसारखी व्यक्ती उभी केल्याने आनंद झाला.

उशिरा का होईना धायबरांचे भाषण अत्यंत नम्रपणाने केलेले थोडके होते. स्वागताध्यक्ष वगैरे इतरांची भाषणे सुमार ! !

खरे समाधान झाले भालजींच्या भाषणाने ! ! आजच्या मराठी चित्रसृष्टीची अधोगती अशा प्रभावी परखड योग्य शब्दांत वर्णन केली की श्रोते थक्क झाले, इतकेच नाही तर एकदा कुणीतरी बोलायलाच हवे असे भालजी बोलले हा आनंदही श्रोत्यांना झाला. भालजींचे भाषण बाहेरच्या श्रोत्यांना आवडले खरे, पण चित्र-सृष्टीतल्या बऱ्याच लोकांना आवडले नाही. कसे आवडावे ? भालजींनी त्यांच्या नेमक्या दोषांवर बोट ठेवले होते ना ? बऱ्याचजणांनी नंतर खाजगीत या भाषणावर टीका केली, आक्रस्ताळेपणा केला. पण त्याला कांही अर्थ नव्हता. भाषण स्मरणीय झाले यात शंकाच नाही.

भालजी एक दर्जेदार वक्ते आहेत हे या भाषणातून प्रकर्षाने जाणवले. पहिल्या दीड दोन मिनिटात श्रोत्यांना त्यांनी असे आकृष्ट केले की एक तास कधी झाला


स्वच्छ दात आणि निरोगी हिरड्या
सदैव राखण्यासाठी
अर्कशालानिर्मित

**बकुल दंत धावन**

रोज सकाळी वापरा.
अकाली दात हालणे, हिरड्यांतून रक्त येणे,
घाण येणे आदी तक्रारी थांबतात.

**आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा**

**विक्री केंद्रे – हुबळी, हैद्राबाद, अकोला,**
**नांदेड, मुंबई (गिरगाव), कोल्हापूर.**

[मावळा – सातारा]

हे कुणाला जाणवलेच नाही. भाषणपद्धतीही विलक्षण धीरगंभीर आणि श्रोत्यांना आकृष्ट करून घेणारी! मुद्दा पटवून द्यायचा तोही सोप्या शब्दांत, सोप्या दृष्टान्ताने भालजींचे भाषण संमेलनात उल्लेखनीय झाले ते याचमुळे !!

आता परिसंवाद ! कल्पना एकदम झकास ! नाविन्यपूर्ण ! पण त्याचे संचलन बरोबर नव्हते. प्रेक्षकांनी विचारलेल्या प्रश्नाला म्हणे व्यवसायातले लोक उत्तरे देणार ! किती छान होती कल्पना ! पण संमेलनाला आधी लोक आले किती ? मूठभर, यातही बरेचसे निरुत्साही. तशात पुढे ठेवण्यात आलेले प्रश्नही नीटसे मांडले नव्हते, झणझणीत नव्हते. (एक-दोन फारच बोचरे आणि स्पष्ट शब्दांत विचारलेले प्रश्न दाबून ठेवले, असे निश्चित माहीत आहे, असे का ?) एकूण कल्पना उत्तम असूनही हाताळणी बरी नसल्याने हा कार्यक्रम नीरस ठरला.

हे झाले संमेलन. आता करमणुकीचा कार्यक्रम !! याला मात्र रसिक पुणेकर फार मोठ्या आशा बाळगून मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. पण पदरात काय ? फारसे काहीच नाही !! तरीही ६-७ तास सोशीकपणाने कार्यक्रम पाहात होते पुणेकर सोशिक हे चित्रपटवाल्यांचे भाग्यच-एरवी कठीण होते. कारण काही मात ब्बर लोकांची नावे जाहीर होऊन ते आले नाहीत. आणि जे आले त्यांतील बऱ्याच लोकांनी नुसत्या पाटया टाकल्या. खरा नाविन्यपूर्ण, उल्लेखनीय कार्यक्रम दिला तो लता मंगेशकर यांनी-महाराष्ट्रदर्शन हा रंगतदार कार्यक्रम सादर करून खरोखर त्या करमणूक कार्यक्रमाची लाज राखली असेच वाटते. पिटिल थिएटर, शाहीर साबळे, पिराजी सरनाईक यांचे साहाय्य घेऊन महाराष्ट्राच्या खेडयांतील जीवनात घडणाऱ्या विविध गोष्टी-(अभंग, गोंधळ, वासुदेव, भारूड, बहुरूपी वगैरे) या महाराष्ट्रदर्शनात मोठ्या सफाईने, सुव्यवस्थितपणाने सादर झाल्या. कार्यक्रम बसविण्यासाठी काही मेहनत घेतली आहे, हे पदोपदी जाणवत होते. पण इतरांच्या कार्यक्रमात तसे कुठेच जाणवले नाही. नृत्यात थिल्लरपणा, नाटयप्रवेशात ना कसली रंगत, ना अभिनयदर्शन, गाण्यांची निवड सामान्य. असा एकूण प्रकार !

असो, या साऱ्यांविषयी लिहावे तेवढे थोडेच !! आता पुढील वर्षी म्हणे नाशिकला संमेलन भरणार आहे. ते कसे होईल, हे आता कोण सांगणार ? पण एवढे मात्र नक्की की, नाशिकला कुणी चारुदत्त सरपोतदार भेटला नाही तर यंदा झाले एवढेही होणार नाही, ही अगदी काळ्या दगडावरची रेघ ! या सिनेमावाल्यांपैकी बऱ्याचजणांना हे संमेलनच नको आहे, आणि हवं आहे त्यातल्या फारशा कुणाला अंग मोडून काम करायला नको, मग होतं काय, त्यांचा एखादा सन्मित्र पुढे यतो, राबराब राबतो आणि हे लोक जमलं तर संमेलनाला येणार ! असा एकूण प्रकार!! म्हणून म्हणतो, नाशिकचे संमेलन व्हावेच असे ज्यांना कुणाला वाटत असेल त्यांनी नाशिकचा एखादा चारुदत्त शोधण्याच्या खटपटीला आतापासूनच लागावं, वर्षभर अशी व्यक्ती शोधली तरी पुष्कळ झालं असं म्हणता येईल. ○

# मॉंटीज डबल

अनुवाद : अनंत भावे

## ८



इंग्लंडला निघालेले हे विमान अगदी लहानसे आणि खिळखिळे झालेले होते. बहुतेक सारी विमाने डी-दिनाच्या मोहिमेत गुंतलेली असल्यामुळे इतर कामांसाठी असलेली, मोहिमेला निरुपयोगी असलेली विमाने वापरण्यात येत होती. माणसांचा तुटवडा असल्यामुळे वैमानिक आणि इतर कर्मचारी यांच्यावर कामाचा फार ताण पडलेला होता. त्यांना पुरेशी विश्रांती मिळालेली नव्हती. शिवाय विमान शस्त्रसज्ज नव्हते. शत्रूच्या तडाख्यात सापडल्यास अगतिकपणे त्याचा चुराडा होणे अटळ होते.

जेम्स जीव आणि ते जीवघेणे पुडके मुठीत घेऊन आपल्या जागेवर चुळबुळत बसला होता. अमेरिकन नौदलातील दहाबारा सैनिक हे जेम्सचे सहप्रवासी. ते दारू पिऊन तर्रर झालेले होते. आपसांत त्यांची बाचाबाची आणि मारामाऱ्या निर्वेधपणे चालू होत्या. विमानतळावरील कस्टमच्या अधिकाऱ्याला हुलकावणी देऊन त्यांनी काही चोरीचा माल बरोबर आणला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी कास्टेल बेनिटोच्या विमानतळावर विमान उतरले. पुन्हा एकदा कागदपत्रांची तपासणी झाली. ही तपासणी चालू असता वैमानिक गाढ झोपी गेला. नंतर कितीतरी वेळ त्याला उठविण्याचा कार्यक्रम चालला होता. विमानाचा ताबा घेतला तेव्हासुद्धा तो अर्धवट झोपेतच होता. विमान चालवताना त्याला झोप लागू नये अशी जेम्स मनोमन प्रार्थना करीत होता.

थोड्याच वेळात विमान जिब्रॉल्टरला पोहोचले. जेम्स खाली उतरला. मॉंटी म्हणून काही दिवसांपूर्वी तो जिब्रॉल्टरला आला तेव्हा त्याचे केवढे प्रचंड स्वागत झाले होते ! आज त्याच जागी त्याच्या स्वागतासाठी (?) एक खत्रुड चेहऱ्याचा मेजर उभा होता. त्याने आपल्या दमदार, तिरसट आवाजात सगळ्यांना कार्यालयात जाण्यास फर्मावले.

ते विमान पुढे लगेच इंग्लंडला नेण्यात येणार नव्हते. वैमानिकाला विश्रांतीची आवश्यकता होती. त्यामुळे काही काळ जिब्रॉल्टरमध्ये राहणे क्रमप्राप्त होते. तोपर्यंत उतारूंची राहण्याची व्यवस्था शहरातील एका हॉटेलात केली होती.

जेम्सने मेजरला विचारले, "हॉटेलमध्ये आम्हांला पोचवण्याची व्यवस्था केली आहे काय ?"

"हॉटेलात पोचवण्याची व्यवस्था ?" मेजर कुत्सितपणे म्हणाला, "तुम्ही स्वत:ला काय फील्ड-मार्शल वगैरे समजता की काय ? जायचं तर पायी जा हॉटेलात. म्हणे पोचवण्याची व्यवस्था आहे काय ? हूं !"

जम्सचा संताप अनावर झाला. त्याचे हात पाठीमागे गुंफले गेले. मात्र त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडण्याआधीच त्याच्या नौदलातील सहप्रवाशांपैकी एकाने त्या मेजरची हजेरी घ्यायला सुरुवात केली. शेवटी मेजरने त्यांना हॉटेलमध्ये पोचविण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले.

तोपर्यंत सगळ्यांनी विमानतळावरील उपाहारगृहाकडे मोर्चा वळवला होता. जेम्स काउंटरवर रेलून उभा होता. पलीकडे परिचारकान कोणाला तरी विचारले, "काय देऊ साहेब ?" जेम्सचे लक्ष परिचारकाकडे गेले. परिचारक मध्यम वयाचा होता. त्याचे केस भुरे आणि भिवया झुपकेदार होत्या. डोळे राखी रंगाचे होते.

परिचारकाने ज्याला विचारले होते तो म्हणाला, "तू इथला दिसत नाहीस. भाषेवरून तू दुसऱ्या देशातला असावास असं वाटतं."

"होय. मी नॉर्वेजियन आहे." परिचारकाने उत्तर दिले.

जेम्सची स्मरणशक्ती चाळवली गेली. जिब्रॉल्टर -- विमानतळावरचे उपाहारगृह - नॉर्वेजियन परिचारक - शत्रूचा हस्तक ? - ! सर राल्फ ईस्टवुडबरोबर लव्याचवडच्या बाता मारून यालाच तर फसविले आपण. वापरे. आत्ता याने आपल्याला पाहिले आणि ओळखले तर ? त्याचे लक्ष जाण्यापूर्वीच जेम्सने तोंड फिरवले. त्याच्या मनात एक गमतीदार विचार आला : त्या परिचारकाला विचारावे, 'तीनशेतीन क्रमांकाची योजना कुठवर आली ?'

एवढ्यात मोटार आली. तिच्यातून ते हॉटेलकडे निघाले. काही दिवसांपूर्वी त्याच रस्त्यातून जाताना, दुतर्फा उभे राहून लोक मॉंटी ऊर्फ जेम्सचा उत्साहाने जयजयकार करीत होते. आणि आज ? रस्त्यावरचे कुत्रेसुद्धा त्याच्याकडे ढुंकून पाहात नव्हते.

हॉटेलातील आपल्या खोलीत जाऊन जेम्सने बिछान्यावर देह झोकून दिला. डोळे गच्च मिटून झोप आणण्याचा प्रयत्न केला. पण झोप येईना. सहज त्याला जेवणाची आठवण झाली आणि तो चपापला. जेवायला पुरेसे पैसे कुठे होते त्याच्याकडे हेवुडने दिलेले पैसे जवळजवळ संपले होते. आता जेवायचे कसे ? आणि इंग्लंडला पोहोचल्यावर खिशात पैसे नसतील तर कसे करायचे ?

जेम्सची झोप पार उडाली. डोळे सताड उघडे ठेवून तो विचार करू लागला. इतक्यात त्याच्या डोळ्यांना समोरच्या भिंतीवर लावलेला सूचनाफलक दिसला. त्याच्यावर लिहिले होते : 'परकीय चलन बदलून हवे असल्यास रॉयल आर्मी पे कॉर्प्स ऑफिसमध्ये या.'

पण जवळ कसलेच चलन नसेल तर ? तर कुठे जायचे ? शिवाय जेम्सची आणखी एक अडचण होती. समजा पगारखात्यात गेला आणि लिसेस्टरचा कोणी अधिकारी भेटून त्याने चौकशी आरंभली तर ? जेम्सने घेतलेली गुप्ततेची शपथ अजून सुटलेली नव्हती.

जेम्सला काही सुचेना. काहीतरी करावे म्हणून तो हॉटेलातून बाहेर पडून रस्त्यावर आला. हातात अर्थातच ते रहस्यमय पुडके होतेच. सरकारी भवनात सर राल्फ ईस्टवुड यांच्याकडे पैसे उसने मागण्याची तीव्र इच्छा जेम्सला झाली. पण ती प्रत्यक्षात न आणणेच शहाणपणाचे होते, आणि जेम्सनेही तसाच निर्णय घेतला. शेवटी त्याने गुप्तपोलिसखात्याचा वरिष्ठ अधिकाऱ्याला भेटायचे ठरविले. जेम्सची कामगिरी त्याला ठाऊक असण्याचा संभव होता. त्यामुळे कदाचित तो मदत करायला उद्युक्त झाला असता.

पत्ता काढीत जेम्स गुप्तपोलिसखात्याच्या इमारतीपाशी पोहोचला. आपल्याला वरिष्ठ अधिकाऱ्याला भेटायचे आहे असे त्याने तेथील एका हवालदाराला सांगितले.

"माफ करा. पण असं एकदम भेटता येणार नाही त्यांना. आधी ठरवून भेट घ्यायला पाहिजे तुम्हांला."

"आधी कसं ठरवणार ? काम अचानक उपटलं माझं, त्यांना भेटलंच पाहिजे मला."

"काय काम आहे तुमचं ?"

"काम खासगी आहे आणि अत्यंत महत्त्वाचं आहे."

"कसंही असलं तरी ते मला सांगायलाच लागेल तुम्हांला. त्याशिवाय साहेबांची भेट नाही घेता येणार."

"पुष्कळ बोललास. आता मी सांगतो तसं कर." एखादा चाबुक कडाडावा तसा जेम्स कडाडला. हात पाठीमागे गुंफून माँटीच्या दिमाखात तो म्हणाला, "साहेबांना सांग की मला त्यांना ताबडतोब भेटायचं आहे."

हवालदार हादरला. मऊ, विनयी आवाजांत म्हणाला, "ठीक आहे. मी प्रयत्न करून पाहतो. पण साहेब रागावले तर मात्र सांगू नका."

जेम्स त्याच्या मागोमाग वरच्या मजल्यावर गेला. तेथे साहेबांना भेटण्यासाठी काही सैनिकी अधिकारी प्रतिक्षालयात तिष्ठत बसले होते. हवालदाराने साहेबांच्या खोलीचे दार वाजवले. तो आत गेला. काही मिनिटांतच बाहेर येऊन त्याने जेम्सला आत जाण्यास सांगितले.

जेम्सने दार वाजवले आतून एक घोरगंभीर आवाज आला. "आत या." जम्स आत गेला.

खोली अगदी साधी होती. दारासमोर टेबल होते. टेबलाशी एक भेसूर दिसणारा आडदांड कर्नल बसला होता. इतका भेसूर माणूस जेम्सने क्वचितच पाहिला होता. आपली करडी नजर रोखून जेम्सला आपादमस्तक न्याहाळीत त्याने विचारले, "काय एवढं महत्त्वाचं काय आहे तुझं ?"

जेम्स बावरला. त्याला नीट सांगता येईना. तो अडखळत म्हणाला, "काम म्हटलं तर महत्त्वाचं आहे, म्हटलं तर नाही. काम आहे पैशासंबंधी. काय आहे की माझ्याजवळ अजिबात पैसे नाहीत. मला वाटलं आपण मला काही पैसे..."

"एक छदाम मिळणार नाही." कर्नल गरजला, "सगळीकडे सूचना लावल्या आहेत त्या समजत नाहीत काय तुला ?"

"समजतात. पण –"

"पणबिण काही समजत नाही मला. पैसे हवे असतील तुला तर पगारकार्यालयात जा. इथं काय पैसे वाटायला बसलोय मी ? चल चालू लाग इथून."

चालता होण्याऐवजी जेम्स ठासून तेथेच उभा राहिला. बेदरकारपणे त्याने कर्नलच्या नजलेला नजर भिडवली. काही क्षण ते एकमेकांकडे निश्चलपणे टक लावून पाहात होते. मग जेम्स शब्द मोजीत म्हणाला, "मला वाटतं, तुमची चूक होते आहे–"

अविश्वास, क्रोध, कुतूहल, आश्चर्य असे भाव कर्नलच्या चेहेऱ्यावर एकापाठोपाठ एक उमटून गेले. अजून तो जेम्सकडे टक लावून पाहत होता. मग अकस्मात त्याच्या चेहऱ्यावरचा ताण कमी झाला आणि तेथे स्मित झळकले.

" अरे बापरे...तू तर—होय, तोच तू. आता चांगलं ओळखलं मी तुला, कैरोहून तू इथं येणार आहेस हे कळवलंसुद्धा नाही कोणी मला. "

कर्नल उठून उभा राहिला. जेम्सशी आपुलकीने हस्तांदोलन करीत म्हणाला, " काय अप्रतिम सुंदर नाटक केलंस तू. मी ते जन्मात विसरणार नाही. मी असं ऐकलं की राज्यपाल साहेबसुद्धा फार खूष आहेत तुझ्या कामावर. "

त्याने जेम्सला सिगारेट दिली आणि म्हणाला, " आता सांग मला, तुला काय पाहिजे ? "

जेम्सने आपली अडचण सांगितली. आपण पगारकार्यालयात जाण्यात धोका कोणता आहे तेही स्पष्ट केले.


स्वातंत्र्यवीर सावरकरलिखित
ग्रंथांच्या स्वस्त आवृत्त्या

| ' १८५७ चे ' स्वातंत्र्यसमर | काळे पाणी | सहा सोनेरी पाने |
|---|---|---|
| मूळ मराठी प्रत | रोमांचक कादंबरी | भारताची विजय गाथा |
| मूळ किंमत १५ रुपये | मूळ किंमत १० रुपये | मूळ किंमत १५ रुपये |
| स्वस्त आवृत्तीची किं. रुपये ७–५० फक्त | स्वस्त आवृत्तीची किं. रुपये ५ फक्त | स्वस्त आवृत्तीची किं. रुपये ७–५० फक्त |

नोंदणी सुरू आहे. कोणतेही एक नोंदवू शकता.
तिन्ही एकाच वेळी नोंदविल्यास फक्त एकोणीस रुपयांत.
पुस्तक–विक्रेत्यांकडे अगर

मॅजेस्टिक बुकस्टॉल

* गिरगाव नाका, मुंबई ४. * शनिपाराजवळ, पुणे २.

कर्नलने जेम्सला दहा पौंड दिले तेवढे पुरतील काय, असे विचारले.

" पुष्कळ झाले. मी आपला अत्यंत आभारी आहे. "

" आभार तू कसले मानतोस. तू भेटलास म्हणून मीच आभार मानले पाहिजेत तुझे. "

जेम्सच्या मोहिमेबद्दल, डी-दिनाबद्दल ते थोडा वेळ बोलत बसले. जेम्स जायला निघाला तेव्हा कर्नल स्वत: त्याला पोचवायला जिन्यापर्यंत आला. त्याने जेम्सला एखाद्या जवळच्या मित्रासारखा निरोप दिला. प्रतीक्षालयात बसलेले, कर्नलला ओळखणारे ते सैनिकी अधिकारी जेम्सकडे अतीव आश्चर्याने पाहात होते. एकजण तर पुटपुटला, " याच्याकडे निश्चित काही जादू असली पाहिजे. "

संध्याकाळी जेम्स पुन्हा विमानात बसला. सकाळ झाली तेव्हा विमान इंग्लंड-जवळ आले होते. मध्येच विमानात काही बिघाड झाला. ते कोसळणार असे प्रवाशांनाच नव्हे तर खुद्द वैमानिकालासुद्धा वाटले. आपल्या धाडसी मोहिमेची अखेर अशी केवीलवाणी इतिश्री होणार असा खेदजनक विचार जेम्सच्या मनात आला.

पण सुदैवाने तसे झाले नाही, विमान कसेबसे विमानतळावर उतरले. डेव्हॉन-शायर परगण्यातील अगदी छोटासा विमानतळ होता तो. तुफान पाऊस पडत होता. आपापले सामान घेऊन प्रवाशांनी दूर असलेल्या कार्यालयाकडे पाय वळवले.

नॉर्थोल्टच्या विमानतळावरून माँटी म्हणून इतमामात केलेले अद्‌भुतरम्य प्रयाण कोठे आणि या दरिद्री विमानतळावर लेफ्टनंट क्लिफ्टन-जेम्स म्हणून एखाद्या अगतिक निर्वासितासारखे केलेले पुनरागमन कुठे !

प्रवाशांची वैद्यकीय तपासणी सुरू झाली. एक करडा दिसणारा मध्यमवयीन डॉक्टर तपासणी करीत होता. जेम्सची पाळी आली. डॉक्टरांनी त्याचे कागदपत्र पाहायला मागितले. जेम्सने आपले ओळखपत्र आणि इतर कागदपत्र दाखवले.

त्यांच्यावर ओझरता दृष्टिक्षेप टाकून डॉक्टर रागावून म्हणाले, " हे नव्हे; मला पूर्वीच्या वैद्यकीय तपासणीचे कागदपत्र पाहायचे आहेत. "

डॉक्टर कशासंबंधी बोलत आहेत ते जेम्सला कळत नव्हते. म्हणून त्यानेही चिडक्या स्वरात उत्तर दिले,

" पूर्वीच्या वैद्यकीय तपासणीचे कागदपत्र ? माझ्याजवळ असले कागदपत्र नाहीत. माझ्यापाशी जेवढे होते तेवढे सगळे कागदपत्र तुमच्यापुढं ठेवले आहेत मी. "

डॉक्टर दुखावले, सरसावून बसत ते म्हणाले, " माझा वेळ फुकट घालवू नका तुम्ही. मला पुष्कळ काम आहे. " नंतर टेबलावर पुढे झुकून डॉक्टर सावकाश, प्रत्येक शब्दावर जोर देत म्हणाले,

" इंग्लंड सोडताना रोगप्रतिबंधक लस टोचून घेतलीच असेल तुम्ही, त्याचा दाखला हवाय मला. तुम्ही दिलेल्या कागदपत्रात तो दाखला नाही. "

तत्क्षणी आपण कोणत्या चमत्कारिक परिस्थितीत सापडलो आहोत हे जेम्सच्या लक्षात आले. त्याच्याजवळ तसला दाखला नव्हताच मुळी. वास्तविक परदेशी जाताना प्रत्येकाला टोचून घ्यावे लागे. अगदी राजाला, पंतप्रधानांनासुद्धा, पण लक्षावधी माणसांत ज्याला इंग्लंड सोडताना टोचून घ्यावे लागले नव्हते असा जेम्स एकटाच होता !.. त्या बाबतीत काय झाले असावे ते एकदम जेम्सच्या ध्यानात आले, सुरुवातीला त्याला फक्त जिब्राल्टरला पाठविण्यात येणार होते, पण अचानक योजनेचा विस्तार झाला आणि त्याला मध्यपूर्वेतही जावे लागले. तरीही गुप्ततेला बाध येणार नाही अशी काळजी गुप्तहेर खात्याला घ्यावी लागली. वैद्यकीय तपासणी, टोचून घेणे इत्यादी सव्यापसव्य जेम्सच्या बाबतीत करायचे म्हणजे थोडक्यासाठी आणखी काही लोकांना विश्वासात घेणे भाग पडले असते. ते टाळून जेम्सला तसाच पाठवून दिला होता त्यांनी.

डॉक्टर चिरडीस आले होते, आणि जेम्स विचारात पडला होता. पण त्यांना काहीतरी उत्तर देणे भागच होते.

" त्याचं काय आहे, " जेम्स अडखळत म्हणाला, " मी परदेशी गेलो तो टोचून न घेताच गेलो. कारण गुप्त कामगिरीवर होतो मी."

डॉक्टर खुर्चीवरून उठले आणि खोलीत फेऱ्या मारू लागले. मग एकदम जेम्ससमोर उभे राहून ते म्हणाले, " तुम्ही जाताना टोचून घेतलेलं नाही. आणि कैरो आणि मध्यपूर्वेतून परत येताहात. तुमच्याबरोबर साथींच्या रोगांचे सहस्रवधी रोगजंतू आले असतील. असतील म्हणजे काय असतीलच. ही फार म्हणजे फार गंभीर गोष्ट आहे. यामुळं तुम्हांला क्वारंटाईनमध्ये थांबावं लागेल."

" ठीक आहे."

" तुमचं सांगणं थोडं बनवाबनवीचं असावं. खरं सांगायचं तर मला ती चक्क थाप वाटते. लिसेस्टरमधल्या पगारखात्याच्या अधिकाऱ्याशी संधान बांधून मला तुमच्याबद्दल जास्त माहिती मिळवली पाहिजे. "

लिसेस्टरच्या पगारखात्याचा अधिकारी काय ' माहिती ' देणार ते उघड होते. आता काय करावे ? क्षणार्धात विचार करून जेम्सने निर्णय घेतला. डॉक्टरांच्याकडे रोखून पाहात जेम्स निग्रहाने म्हणाला, " तुम्ही फार मोठी चूक करताहात डॉक्टर. माझं ऐकत असाल तर लिसेस्टरच्या पगारखात्याशी संधान बांधण्यापेक्षा तुम्ही लंडनमधल्या युद्धखात्याला फोन करून तो सहाशे चौपन्न क्रमांकाच्या खोलीशी जोडायला सांगा. तेथला अधिकारी माझ्याबद्दल हवी असलेली सगळी माहिती सांगेल तुम्हांला."

डॉक्टर खाजगी आहेत की सैनिकी यावर जेम्सच्या निर्णयाचे यश अवलंबून होते. सैनिकी असल्यास त्यांना सहाशे चौपन्न क्रमांकाच्या खोलीचं महत्त्व माहीत असण्याचा संभव होता.

जेम्सचे बोलणे संपले आणि डॉक्टरांच्या चेहऱ्यावरील भाव एकदम बदलला. आपली मात्रा लागू पडली आहे, हे जेम्सला कळले. डॉक्टरांनी कागदपत्र जेम्सच्या हातात ठेवीत म्हटले, " माफ करा मला. माझं समाधान झालं आहे. आपण जाऊ शकता."

डॉक्टरांशी कृतज्ञतेने हस्तांदोलन करून जेम्स बाहेर पडला.

इतक्यात कस्टमचे अधिकारी आले. त्यांनी सर्वांच्या सामानाची तपासणी सुरू केली. जेम्सच्या बाकीच्या सामानाची तपासणी झाल्यावर त्यांचे लक्ष त्याच्या हातातील त्या पुडक्याकडे गेले. एका अधिकाऱ्याने त्याला दरडावून विचारले, " पुडक्यात काय आहे त्या ? "

" ते मलासुद्धा माहीत नाही." जेम्स गांभीर्याने म्हणाला, " अगदी गुप्त आहे हे पुडकं. इंग्लंडला पोचल्याशिवाय त्याच्यावरचा कागद काढायचा नाही, आणि पत्ता वाचायचा नाही अशी ताकीद दिलीय मला. मग, मला वाटतं ते युद्धखात्या-कडे पाठवायचं असावं."

" ते नंतर. आणि आता इंग्लंडात नाहीत तर कुठं आहात तुम्ही ? उघडा ते पुडकं."

जेम्सचा नाइलाज झाला. त्याची छाती धडधडू लागली. थरथरत्या हातांनी त्याने कस्टम्सच्या अधिकाऱ्यांच्या नजरेखाली वरचा कागद फाडला. आत एका बाईचा पत्ता लिहिला होता. आणि प्रत्यक्ष पुडक्यात होते फळांचे डबे, साबणाच्या वड्या आणि चॉकलेटे !

जेम्सचा चेहेरा फोटो काढण्यासारखा झाला होता. कस्टमचे अधिकारी खो खो हसू लागले. आणि जेव्हा जेम्सने त्यांना त्या पुडक्याची चित्तरकथा संपूर्ण सांगि-तली तेव्हा तर ते हसून हसून बेजार झाले.

विमानतळावरून जेम्स जवळच्या रेल्वेस्टेशनवर गेला आणि त्याने वॉटर्लूला जाणारी गाडी पकडली.

**(अपूर्ण)**

---

## पत्र-व्यवसायाचे मर्म

काही दिवस पत्र-व्यवसायात घालविलेले अमेरिकन कायदेपंडित प्रा. रिचर्ड गार्डनर यांनी दिल्लीत प्रकट केलेले मत :

पत्र-व्यवसायामुळे माणसाला कठीण गोष्ट सोपी व रसपूर्ण करण्याचे अत्यंत मूल्यवान शिक्षण मिळते.

---

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## ११ ते १७ मे राशि-भविष्य

**मेष :** कित्येक दिवसांपासून सतत प्रगतिपथावर असलेल्या मेष राशी व्यक्तींना हे दिवसही आघाडीचे स्थान देऊन जातील. गुरूचे कृपाछत्र आहे—लवकरच सूर्य-मंगळाचीही सहानुभूती लाभू लागेल. साडेसातीबद्दलची भीती मनातून काढून टाका. द्वितीयातील मंगळामुळे खर्चामध्ये काहीशी वाढ झाली तरी त्याबद्दल खंत बाळगण्याचे मुळीच कारण नाही, दुसऱ्या बाजूने प्राप्तीचे मानही वाढत राहील.

इतिहास–भूगर्भशास्त्र-नियोजन या क्षेत्रातील व्यक्तींना हे दिवस अत्युत्तम प्रगतीचे जाणवतील.

दि. १६ मे चा सूर्य-हर्षल त्रिकोण अनेक आश्चर्यकारक घटना घडवील.

**वृषभ :** सूर्य–हर्षल त्रिकोणामुळे (१६ मे) या आठवड्याचे महात्म्य वाढलेले आहे. आणि हा योग तुमच्या वृषभ राशीतील संलग्न असल्यामुळे या योगामुळे अधिकाधिक कोणाचे भले होणार असेल तर ते तुम्हा वृषभ राशी व्यक्तींचेच !

व्यवसायधंद्याला अनपेक्षितपणे प्रचंड उत्थान मिळेल, विद्युत, यांत्रिक क्षेत्रात पदार्पण घडेल. नव्या धंद्यासाठी लागणारा पैसा अनेक मार्गांनी हाती येऊ लागेल.

स्थावराचा प्रश्न सुटेल, वाहनांची समस्या मिटेल, कौटुंबिक वातावरणात प्रसन्नता दाखवू लागेल. अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडू शकेल.

दि. १५ ते १७ मे या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** मंगळ व्यवसायात आला की, 'सारेच मुसळ केरात.' प्राप्ती घटू लागते आणि खर्च मात्र सहस्रमुखांनी वाढू लागतो. आणि याचा परिणाम काही घडायचा तो घडतोच.

पाहुण्यांची वर्दळ वाढेल, मंगलकार्याचे, खर्चाचे अंदाजपत्रक साफ चुकेल, व्यापार-धंद्यात तर फार मोठी चूकभूल व्हायला लागेल. या वेळी एकच एक आशास्थान पराक्रमस्थ गुरू. ती ऐनवेळी मदतीचा हात पुढे करील. अब्रूला धक्का लागणार नाही एवढेच.

व्यवहारधंद्यातील साहस अंगाशी येण्याचा संभव फार आहे. प्रत्येक गोष्ट करण्या-पूर्वी निदान १० वेळा तरी विचार करा. दि. १२,१५,१६ मे अल्पस्वल्प यश लाभेल.

**कर्क :** ग्रह अनुकूल यायला लागले की, परिस्थिती कशी झपाट्याने बदलेल याचे प्रात्यक्षिक म्हणजे सध्याचे आपले जीवन. प्रामुख्याने १६ मे च्या आगेमागे आपल्या जीवनात उत्क्रांती घडेल, अभिनव असामान्य असे काही घडेल. जे जे घडेल ते ते आपल्या चारित्र्याची उंची वाढविणारे असेच असेल.

शैक्षणिक क्षेत्रात विक्रमी यश मिळवाल, सामाजिक-राजकीय आखाड्यात आवाज उठवाल. या आठवड्यातच तुमचे बऱ्याच दिवसांचे स्वप्न साकार होऊ शकेल. प्रवास, बदल, स्थानांतर असेही काही या वेळी घडावे.

दि. १५ ते १७ मे या कालावर लक्ष केंद्रित करा.

**सिंह :** या वेळची ग्रहांची हालचाल पाहून तुमच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते की, या वेळचे तुमचे प्रगतीचे त्रैराशिक मुळीच चुकणार नाही. नोकरी-धंद्यात प्रगती-कडे पावले पडू लागतीलच. शिवाय या वेळचे तुमचे राजकीय धोरण हिरिरीने अमलात आणले जाईल. या तुमच्या कार्यास अनेकांचे सहकार्यही लाभेल.

अगदीच नवीन अशा व्यवहार–धंद्याशी या वेळी आपला घनिष्ठ संबंध यायला लागेल. यांत्रिक धंद्यातील व्यावसायिकांना तर पुढे जाण्याची संधी लाभेल.

दि. १५ ते १७ मे या काली आपल्या साऱ्या अपेक्षा सफल व्हाव्या.

**कन्या :** सध्या सूर्य, मंगळ, बुध, आणि लवकरच शुक्रही भाग्यस्थानातून संचार-णार आहे. तुमच्या भाग्याला उधाण आणायला यापेक्षा अधिक काय हवे ? व्याव-सायिक परिस्थिती झपाट्याने सुधारू लागेल, नोकरीतील उच्चाधिकार कोणत्याही क्षणी लाभेल, सांपत्तिक स्थिती अपेक्षेबाहेर सुधारेल, इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य न मागताही मिळू लागेल.

या सबंध वर्षातील इतका चांगला काल हाच. स्थानांतर–दूरचा प्रवास यांसाठी लवकरच प्रस्थान ठेवावे लागल, सामाजिक क्षेत्रात तुमचा सत्कार होऊ लागेल.

कोणत्याही बाबतीत माघार घेण्याचा घोळ घालीत बसण्याचा आता प्रश्नच नाही. सहज मनात आणावे आणि ते धवधवीत यश घेऊन उठावे असा अनुभव पदोपदी यायला लागेल. दि. १४ ते १७ मे या कालाची नोंद ठेवा.

**तूळ :** सध्याची गृहस्थिती काहीशी नाजूकच आहे. वाटेल तसे करीत आणि हवं ते घडवून आणीन म्हणून चालणार नाही. एकट्या अकराव्या गुरूवर तुमचा भरवसा. पण तो तुमची या वेळची अनिष्टता पूर्णांशाने दूर करू शकेल असं वाटता

नाही. सूर्य-मंगळासारख्या प्रखर ग्रहांपुढे सारेच ग्रह टरकून असतात !

या वेळी अधिक काळजी घ्या. प्रकृतीची आणि तुमच्या पैशाअडक्याची. आणि सध्याच्या महागाईच्या काळात त्याचीच नितान्त गरज असते.

वारा वाहील तशीच पाठ फिरवायची सवय ठेवलीत तर या काळच्या अनिष्ट तेचेही फारसे वाटणार नाही.

व्यापारधंद्यात – कलाक्षेत्रात काहीशी माघार जाणवायला लागेल. थोडेफार बरे दिवस. १५ ते १७ मे एवढेच.

वृश्चिक : सूर्य–मंगळ सप्तमात – हे ग्रह तुम्हांला फारसे पुढे सरकू देणार नाहीत. तुमची प्रगती रोखणे हेच त्यांचे कार्य.

पण दीर्घकाल ही अवस्था जाणवणार नाही. १६ मे च्या सूर्य–हर्षल त्रिकोणापासून थोडंफार आशादायक वातावरण दिसू लागेल. पण अपेक्षासाफल्याचे हे दिवस नव्हेत. काहीसे जपून मिळते जुळते घऊन वागलात तरच तुमचा निभाव लागेल.

उद्योगधंद्याचे तंत्र बदलायला हवे याची प्रकर्षाने जाणीव व्हायला लागेल.

पण प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही, मानसिक औदासीन्य वाढू शकणार नाही. उलट अशा विरोधी वातावरणातच तुमचा आत्मविश्वास उफाळून येतो.

दि. १६ ते १८ मे अनुकूल दिवस.

धनू : सूर्य–मंगळांनी तुम्हांला खूपच दिलासा दिलेला आहे. शनि–राहूंची आता फारशी बाधा होऊ शकणार नाही. गेल्या कित्येक महिन्यांतील असफल आशा-आकांक्षा या कालापासून सफल होण्याची लक्षणे दिसायला लागतील.

स्थावराची समस्या मिटेल, वाहनाचा प्रश्नही सुटेल. विरोधक आता हळूहळू मागील दाराने पसार व्हायला लागतील.

१५, १६, १७ मे या कालातील महत्त्वपूर्ण घटनांवर लक्ष केंद्रित करा. त्या गोष्टीमुळेच तुमचा भविष्यकाल उज्ज्वल असल्याची तुम्हांला खात्री वाटू लागेल.

नोकराचाकरांवर मात्र सर्वस्वी अवलंबून राहू नका.

दि. १५ ते १८ मे अत्युत्तम प्रगतीचे दिवस.

मकर : मध्यंतरीच्या अनिष्टतेवर पडदा पडेल आणि गतिमान जीवनाचा पुन्हा प्रत्यय यायला लागेल. भाग्यस्थ हर्षलशी सूर्याचा त्रिकोण – ग्रहस्थिती तुमच्या जीवनाला उत्क्रांत करील. प्रतिमा वहरेल, प्रज्ञा विकसेल.

ध्यानी मनी नसलेल्या अनंत प्रगत घटना या वेळी घडून यायला लागतील.

मंगलकार्याचे ठरेल, परदेश गमनानासाठी प्रस्थान ठेवले जाईल. यांत्रिक व्यवहाराच्या योजना आखल्या जातील, नोकरीतील प्रगतीचे अनेक टप्पे ओलांडले जातील. तुमच्या जीवनातील सर्वंकष प्रगतीचा काल म्हणून तुमच्या जीवन–इतिहासात नोंद केली जाईल.

दि. १४ ते १७ मे या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ :** चौथ्या रवि-मंगळाचा धिंगाणा संपेपर्यंत थोडेफार हे असेच कंटाळवाणे जाणवेल. गुरू अनुकूल असूनही उपग्रहांच्या साठमारीमुळे त्याचे काय चालणार ?

दगदग, धडपड खूपच करावी लागेल. सांपत्तिक ताण बराच जाणवेल. खर्च अनावर होईल. असे असले तरी या काली अपयशाची नामुष्की स्वीकारावी लागणार नाही.

१६ मे च्या सूर्य–हर्षल त्रिकोणाचा काहीसा अनुकूल परिणाम घडेलच. स्थावराचा प्रश्न सुटेल, वैचारिक संघर्ष मिटेल, प्रतिकूल परिस्थितीवर प्रभावी तोडगा सुचेल.

दि. १५ ते १७ मे अनुकूल व लाभदायक दिवस.

**मीन :** सूर्य–मंगळ पराक्रमात आलेले आहेत. आता तुम्हांला कुणालाही डरायचे कारण नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा केलीत की, अंगीकृत कार्यात अपेक्षित यश निश्चितच मिळेल.

प्रवास–बदली–नोकरीत बढती–व्यापारात प्रगती यांपैकी काहीही घडावे.

या आठवड्यापासून जबाबदाऱ्यांचे ओझे वाढू लागेल, आणि त्या यशस्वीपणे पार पाडून दाखवल्या जातील. साडेसातीच आहे. कोणतीही गोष्ट जिवाचे रान केल्याशिवाय यशस्वी कशी व्हावी, परिश्रमांची तयारी ठेवलीत तर अपयशाची भीती नको.

दि. १३ ते १६ मे विशेष यश पदरी पडेल.

O

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

मृत्युशय्येवर खिळलेला लेनिन क्षीण आवाजात म्हणत होता 'स्टॅलिनला दूर करण्यासाठी काहीतरी केलेच पाहिजे.'

१ जून १९२४ रोजी लेनिनचा अंत झाला आणि रशियातील सत्तासंघर्षाला एक नवेच वळण मिळाले.

ट्रॉटस्की, स्टॅलिन, झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह असा हा चौरंगी सामना आता खेळला जाणार होता.

दैवाचा फासा कोणाच्या बाजूने पडणार व या सामन्यात कोण विजयी होणार हाच खरा प्रश्न होता. खरे म्हणजे रशियन भूमीच्या वैशिष्टयातच या प्रश्नाचे उत्तर दडलेले होते.

व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

या उत्तराचा मागोवा घेणारी प्रदीर्घ लेखमाला.

शेवटचे दोन महत्त्वाचे लेखांक १८ व २५ मेच्या अंकात प्रसिद्ध होत आहेत.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.